। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १८५ वा । सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## थोडक्यात..

### कार दुरुस्तीवरून मारहाण, तीन जणांवर गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी**: जिल्हह्यातील निलंगा ते लातूर रस्त्यावर एका पेट्रोल पंपाजवळ एकाने कार दुरुस्त कर, नाही तर दुरुस्तीसाठी दिलेले पैसे मागितल्याने तिघांनी शिवीगाळ करीत मारहाण केल्याची घटना गुरुवारी घडली. याप्रकरणी किल्लारी पोलिस ठाण्यात संबंधिविरुद्ध शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संजय रावसाहेब जाधव (रा. शिवाजीनगर, निलंगा) यांनी कार दुरुस्तीसाठी दिलेले २० हजार रुपये परत दे, नाही तर कार दुरुस्त करून दे म्हटल्याने आरोपी अकबर मुबारक शेख यानी (रा. शिवणी) शिवीगाळ करीत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. अन्य आरोपीने काठी डोक्यात घालून जखमी केले, फिर्यादीस जीवे मारण्याची धमकीही दिली.

याप्रकरणी शुक्रवारी किल्लारी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

### 'त्या' शिक्षकाच्या मारेकऱ्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी

**लातूर/प्रतिनिधी**: मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून देवणी तालुक्यातील पंढरपूर येथे शिक्षकाचे काम करणाऱ्या तरुणाचा लातूर येथील मेघराज नगरमध्ये चाकूने भोसकून खून करण्यात आला. यातील आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयापुढे हजर केले असता त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

शहराच्या मेघराज नगर भागात राहणारा आशू पंडित शिंदे याने शुक्रवारी (दि.१०) दुपारी सव्वा तीन वाजेच्या सुमारास चाकूने भोसकून रामेश्वर बाबू बिराजदार (वय ३२, रा.सावरगाव, ता. देवणी) यांचा खून केला होता. मयत रामेश्वर बिराजदार हे देवणी तालुक्यातील पंढरपूर येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून प्रशिक्षणार्थी शिक्षक होते. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला शुक्रवारी रात्रीच ताब्यात घेतले होते. शनिवारी (दि.११), त्याला न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मुळे यांनी दिली.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक, सामाजिक समानतेची स्वप्नपूर्ती व्हावी – सरन्यायाधीश भूषण गवई

### मंडणगड दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

**रत्नागिरी/प्रतिनिधी**:मंडणगड येथे झालेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्नशील रहाल. जेणेकरुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक आणि आर्थिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल, अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.



मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. गवई यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री डॉ. उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, पालक न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस. पी. तावडे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनोद जाधव, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमृता जोशी, बार असोसिएशनचे अध्यक्ष अमोल सावंत, सदस्य संग्राम देसाई, वकील संघाचे अध्यक्ष मिलींद लोखंडे, आमदार किरण सामंत, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी मनुज जिंदल आदी उपस्थित होते.

सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते कळ दाबून न्यायालय इमारत प्रांगणातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे तसेच म्युरलचे अनावरण करण्यात आले. यानंतर कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. न्यायदान कक्षाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश श्रीमती जोशी यांना आसनावर विराजमान करण्यात आले. येथील ग्रंथालयाचेही उद्घाटन आणि पाहणी सरन्यायाधीशांनी यावेळी केली.यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या प्रांगणात झालेल्या समारंभात मार्गदर्शन करताना सरन्यायाधीश गवई म्हणाले, आजचा महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. न्यायमूर्ती म्हणून मला २२ वर्षे पूर्ण झाली आहेत. कोल्हापूर खंडपीठाचे उद्घाटन आणि आजच्या मंडणगड न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन हे दोन्ही कार्यक्रम माझ्या २२ वर्षाच्या सेवेमधील महत्त्वाचे आहेत. अतिशय कमी वेळेत मंडणगड येथे न्यायालय सुरु करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. मंडणगड न्यायालयाच्या भूमिपूजनाला आम्ही दोघे उपस्थित होतो आणि आजच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमालाही आम्ही दोघे उपस्थित आहोत. हा गौरवाचा क्षण आहे. महाराष्ट्र शासन विशेषत: विधी व न्याय विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे मी आभार मानतो, त्यांनी मला या इमारतीच्या उद्घाटनाची संधी दिली.

अवघ्या २० दिवसात कोल्हापूर येथील जुन्या इमारतीचा कायापालट करुन खंडपीठ सुरु केले. नाशिक, नागपूर, मंडणगड येथील इमारती पहा. विविध तालुक्यातील न्यायालयांच्या इमारती, माझ्या दर्यापूर तालुक्यातील इमारत पहा. मी अभिमानाने सांगू शकतो, देशातील कुठल्याही तालुक्यामध्ये अशा तऱ्हेची न्यायालये असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती देशातल्या कुठल्याही तालुक्यात असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती महाराष्ट्र शासनाने उभ्या केल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ८ ऑक्टोबर २०२३ रोजी सरन्यायाधीश गवई आणि मी या न्यायालयाचे भूमिपूजन केले. दोन वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिशय सुंदर इमारत उभी केली आहे. कोल्हापूरचे खंडपीठ झाले, सरन्यायाधीश गवईंच्या नेतृत्वात आणि सल्ल्याने हा प्रवास २०१४ पासून सुरु झाला. न्यायालय आणि राज्य शासन यामध्ये दुवा म्हणून ते लक्ष देत आहेत. सातत्याने त्यांचे लक्ष राहीले होते. २०१४ ते २०२५ पर्यंत जवळपास दीडशे न्यायालये आणि इमारतींना मान्यता दिली आणि त्याचे काम सुरु केले. त्यातील अनेक इमारती पूर्ण केल्या आहेत. याचे श्रेय सरन्यायाधीश गवई यांना जाते.

## अनैतिक संबंधास अडसर ठरणाऱ्या विवाहित महिलेच्या पतीला प्रियकराने संपवले

**लातूर/प्रतिनिधी**: प्रेमसंबंधात अडथळा ठरत असल्याच्या संशयावरून एका विवाहित महिलेच्या प्रियकराने तिच्याच पतीवर चाकू हल्ला केल्याची धक्कादायक घटना लातुरातील म्हाडा कॉलनी परिसरात शुक्रवारी रात्री साडेअकराच्या सुमारास घडली. या हल्ल्यात पती गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी दोघा संशयितांना अटक केली आहे. त्यांना न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.


तक्रारदार दीपक दत्तू खेडे (वय ३७, रा. संत गोरोबा सोसायटी, विवेकानंद चौक, लातूर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अविनाश सूर्यवंशी (वय २२, रा. वलांडी, ता. देवणी, जि. लातूर) याचे सचिन सूर्यवंशी यांची पत्नी भक्ती हिच्याशी प्रेमसंबंध होते. या प्रकरणात सचिन अडथळा ठरत असल्यामुळे अविनाशने त्याला ठार मारण्याचा कट रचला. त्यानुसार शुक्रवारी रात्री म्हाडा कॉलनीतील कमानीनजीक बाभळगाव रोड परिसरात अविनाशने धारदार चाकूने सचिनच्या तोंडावर आणि छातीवर सपासप वार केले. या हल्ल्यात सचिन महादेव सूर्यवंशी (वय २४, रा. म्हाडा कॉलनी, लातूर) गंभीर जखमी झाला. नातेवाईक आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले. घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ अविनाश नंदकिशोर सूर्यवंशी आणि त्याच्या साथीदाराला अटक केली. दोघांनाही न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. या प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक रेडेकर करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पतीकडून छळ होत असल्याचे सांगून प्रेयसीने आपल्या प्रियकराला भडकवले, आणि त्यानंतर २१ वर्षीय तरुणाने तिच्या नवऱ्याच्या खुनाचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. १०) रात्री सुमारे १० वाजता म्हाडा कॉलनीच्या प्रवेशद्वाराजवळ घडली. या हल्ल्यात पती गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमीच्या मानेवर, छातीत आणि चेहऱ्यावर गंभीर वार झाल्याने त्याची प्रकृती चिंताजनक आहे. पोलिसांनी हल्लेखोर सचिन सूर्यवंशी आणि त्याची प्रेयसी भक्ती यांना ताब्यात घेतले आहे.

## मराठवाड्यात शक्तिपीठ महामार्ग संयुक्त मोजणीचा नारळ फुटला

**लातूर/प्रतिनिधी**: नागपूर ते गोवा शक्तिपीठ द्रुतगती महामार्ग उभारणीसाठी मराठवाड्यात संयुक्त मोजणीचा नारळ लातूरमधून शुक्रवारी फुटला. लातूर येथील शेतकऱ्यांनी संयुक्त मोजणीच्या प्रक्रियेत सहभाग दर्शविल्याने भूसंपादन प्रक्रियेला आगामी काळात वेग येईल. त्या जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्गाची ४३.१७ किमी लांबी असेल. लातूर, रेणापूर, औसा या तालुक्यांतील २२ गावांमधून हा मार्ग जात आहे.

लातूर तालुक्यातील १३ गावांत २६ किमी लांबीचा भाग जाणार आहे. यासाठी २७५ हेक्टर भूसंपादन करावे लागणार आहे. या महामार्गाचे फायदे शेतकऱ्यांना उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, अविनाश कोरडे यांनी सांगितले. गातेगाव येथील शेतकरी व्यंकटेश ढोणे, चिंचोली येथील शेतकरी अजय बनसोडे आदी शेतकरी मोजणी दरम्यान उपस्थित होते. राज्यातील १२ जिल्ह्यांच्या ३९ तालुक्यांतील ३७१ गावांतून शक्तिपीठ मार्ग जाणार आहे. १२ हजार ६०७ गटांतील ८ हजार ६१५ हेक्टर भूसंपादन या मार्गासाठी करावे लागणार असून, सर्वाधिक सोलापूर जिल्ह्यातील जमीन या मार्गासाठी जाणार आहे. पाच प्रशासकीय विभागांतून जाणारा हा मार्ग १८ देवस्थानांना जोडणार आहे. भूसंपादन प्रक्रियेला काही जिल्ह्यांत सुरुवात झाली आहे. ३६ किमी वनक्षेत्रातून हा मार्ग प्रस्तावित आहे. २६ इंटरचेंजेस या मार्गावर असणार आहेत. मराठवाड्यात नांदेड ३७ कि.मी., हिंगोली ४३.१७, परभणी ६६, बीड ३८, लातूर ४३, धाराशिव ४५ कि.मी. भूसंपादन करावे लागणार आहे.




## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



शेतकऱ्यांसाठी 'हंबरडा' मोर्चामुळे शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षा उंचावल्या आहेत.

## चिमटा दयाचा



नितीमत्ता हरवत चालल्याने हिंसक घटना लातुरात घडत आहेत ! अल्पकाळात दोन खुनामुळे लातूर शहर हादरले आहे !!

## १९ लाख २९ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा वाहनासह जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची परत अवैध धंद्यावर कारवाई

### तीन व्यक्ती विरोधात दोन गुन्हे दाखल

**लातूर /प्रतिनिधी**: १९ लाख २९ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा वाहनासह जप्त करण्यात आले असून तीन व्यक्ती विरोधात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेकडून करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात अवैध धंद्यावर कठोर कारवाई साठी मोहीम जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना दिनांक ११ ऑक्टोंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून गुटख्याची अवैध विक्री करण्यासाठी वाहतूक करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे मार्गदर्शनात सदरचे पथक दिनांक ११ ऑक्टोंबर रोजी पोलीस ठाणे चाकूर व देवणी हद्दीत सापळा लावून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित केलेला गुटक्याची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी वाहतूक करणाऱ्यावर ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असून दोन्ही गुन्ह्यात ०७ लाख ७९ हजार २७० रुपयांच्या प्रतिबंधित गुटख्याचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच गुन्ह्यामध्ये वापरलेली ११ लाख ५० हजार रुपयाची दोन चारचाकी वाहन असा एकूण १९ लाख २९ हजार २७० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रतिबंधित गुटख्याची अवैधरित्या विक्री, वाहतूक, साठवणूक करताना मिळून आलेले इसम नामे १) आजम बशीर शेख, वय २१ वर्ष, राहणार सराय गल्ली, रेनापुर जिल्हा लातूर. २) रिहान अखिल कुरेशी, वय १८ वर्ष,राहणार सराय गल्ली, रेनापुर. जिल्हा लातूर. ३) दिलदार बडेसाब सय्यद, वय ४१ वर्ष, राहणार इकबाल चौक, सनत नगर, लातूर.

याचे विरुद्ध पोलीस ठाणे संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस पोलीस अंमलदार रियाज सौदागर, अर्जुन राजपूत, साहेबराव हाके, सूर्यकांत कलमे, संजय कांबळे, मनोज खोसे, पाराजी पुठ्ठेवाड, तुळशीराम बरुरे यांनी केली आहे.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## मदतीपेक्षा राजकारणच अधिक होत आहे

राज्यात शेतकऱ्यांना मदतीची मोठी गरज आहे. त्यानुसार राज्य सरकारची वाटचाल दिसून येत आहे. काही प्रमाणात तरतुद केली असून शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाई म्हणा किंवा अन्य काही म्हणा थोडी-फार मदत जमा होत आहे. सणाच्यापुर्वी काही मदत मिळत असल्याने शेतकऱ्यांना आनंद होत आहे. मुळात शेतकऱ्यांना मदत मिळावी अशी भावना सर्वच राजकिय नेत्यांत आहे. यात शंका घेण्याचेही कारण नाही. असे जरी असले तरी सध्याला अधिक मदत मिळवी याकडे कमी लक्ष दिसून येते. यात राजकारण अधिक दिसून येते. छत्रपती संभाजीनगर मध्ये उद्धव ठाकरे यांची सभा झाली. यात ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यावर टिका केली. विशेष करून एकनाथ शिंदे यांना टार्गेट केले. उलट शब्दीक वार एकनाथ शिंदे यांनी केला. ठाकरे यांचे ठाकरी शैलीत सरकारला धारेवर धरले. एकंतदरीत राजकारण अधिक दिसून येत आहे. राजकारण असावे मात्र राजकारण शेतकऱ्यांना मदतीचे दिसून येत नाही तर एकमेकावर टिका करण्यात येत आहे. सत्ताधाऱ्यांनी विरोधकावर टिका करायाची व विरोधकांनी सत्ताधाऱ्यावर टिका केली जात आहे. टिका जरूर केली पाहिजे. टिकर करताना जनतेचा पाठींबा मिळाला पाहिजे. केवळ राजकारणीच लोक एकमेकावर टिका करताना दिसून येत आहेत. शेतकऱ्यांना मदतीची प्रश्न बाजूलाच दिसून येत आहे. शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे असे वाटत असेल तर सर्वांनी मिळून मदत केली पाहिजे. एकटे सरकार मदत करेल तीही भरघोष असे वाटत नाही. देवुन किती देणार असा विचार केला तर अतिषय तुटपुंजी मदत दिसून येत आहे. नुकसान मोठे आहे. शेतकरी पुन्हा उभारी घ्यावयाचे झाले तर ते कठिण काम आहे. शेतातील पिकात पाणी आहे. जमीनीतील माती वाहुन गेली आहे. सणासुधीच्या दिवसात हाती येणारे पीक गेले आहे हे तरी मान्य केले पाहिजे. मदतीपेक्षा राजकारण अधिक दिसून येत असेल तर ते योग्य नाही. वास्तविक मदत ही मिळाली पाहिजे कारण दिवाळीचा सण मोठा आहे. अशा सणात अधिक बोनस मदतीची गरज आहे. असे तरी वाटत असले तरी प्रत्यक्षात कमी मदत खात्यात जमा होत आहे. पुन्हा वाढीव मदतीचे आश्वासन दिले जात आहेत. अशा स्थितीत शेतकरी कोणतीही तक्रार न करता वाटचाल करीत आहे. वास्तविक कर्जमाफीचे गाजर कोणी दाखविले किंवा कोणी सुरवात केली, या बाबत चिंतन झाले पाहिजे. शेतकऱ्यास मदत करावयाची व केली असल्याने उद्धार करावयाचा हे योग्य नाही. सध्याला वाटेल तसे शेतकऱ्याबाबत बोलले जात आहे. शेतकऱ्याबाबत नको शब्द वापरले जात आहे. तरी शेतकरी संप पुकारत किंवा आंदोलन करीत नाहीत. आज पर्यंत अनेकांनी शेतकऱ्याचा आवमान केला आहे. तरी बिचारे पोशिंदा शेतकरी गप्प आहेत. शेतकऱ्याबाबत नेते बोलतात हेच अधिकारी व कर्मचाऱ्याबाबत बोलून दाखववे. एखाद्या समाजाविषयी बोलून दाखववे. ते राज्यात काय करतील याचा अंदाज येईल. कोणीही उठावे मदतीपेक्षा राजकारण करावे. नको ते अपशब्द शेतकऱ्याबाबत वापरावे. मुळात मदत द्यायची नसेल तर देवू नका. कर्ज माफ करता येत नसेल तर करू नका. केवळ शेतकऱ्याचा आवमान होर्हल असे अपमानित शब्द वापरू नका. ते शेतात काबाड कष्ठ करून शेती करतात. अन्न धान्य पिकविता. वास्तविक त्यांना कष्ठाचा मोबादला देखील निघत नाही. सोयाबिन काढण्याचा खर्च निघत नाही. शेतकरी सर्व काही सहन करीत असताना त्यांच्या बाबत काहीही बोलणे योग्य नाही. विचारपुर्वक बोलले पाहिजे. मुळात बोलायचे कशाला हा मुळ प्रश्न आहे. शेतकरी काहीही बोलले तर सहन करू शकतात. ते जर पेटून उठले काय होते हे दिल्लीकरांना माहिती आहे. शेवटी तीन कायदे बिनशर्त केंद्राला परत घ्यावे लागले. त्यामुळे शेतकऱ्यासोबत नाद करणे तसे परवडणारे नाही. मुळात सत्ताधाऱ्यांना मत देणारा खरा मतदार शेतकरी आहे. तोच उन्हात, रांगेत तासन-तास उभा राहून मतदान करीत असतो. बाकी एअरकंडीशन मध्ये राहाणारे किंवा एअरकंडीशनच्या गाड्यात फिरणारे किती मतदान करतात हे सत्ताधारी व विरोधकांनी ओळखले पाहिजे. मदत दूरच राहाते, याचा लाभ राजकारण खेळण्यासाठी होतो हे उघड दिसून येत आहे. त्यामुळे वेळीच आता शेतकऱ्याचे प्रश्न ओळखण्याची गरज आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. यात शंका घेण्याचे कारण नाही. त्यामुळे वाटेल तसे बोलून राजकारण करीत असाल तर ते योग्य नाही. मुळात राजकारणी हे बहुसंख्येने हे शेतकरी आहेत. शेतकरीच आमदार व मंत्री अधिक आहेत. कारखानदार किंवा उद्योगपती यांची संख्या कमी आहे. साखर कारखानदार हे राजकारणात मंत्री, आमदार आहे हे कोठेतरी मान्यच केले पाहिजे. त्यामुळे आपण शेतकरी आहोत हे विसरून राजकारण खेळत असता हेच दुर्देवी बाब आहे. त्यामुळे शेतकऱ्याविषयी बोलताना चांगले बोलता येत नसेल तर अयोग्य तरी बोलू नये. शेतकरी सतत घडाळ्याचा काट्या प्रमाणे काबडकष्ठ करतात. इतर कोणीही तसे कष्ठ करीत नाही. विमान, रेल्वे किंवा आलिशान एसी गाड्यात फिरणाऱ्यांनी शेतकऱ्याचे दुःख माहिती नसते. त्यामुळे सध्याला शेतकऱ्याविषयक राजकारण खेळले जात आहे. राज्यात पूरजन्यस्थिती निर्माण झाली. राज्यात शेतकऱ्याबरोबर रस्ते व पुलाचे, शाळांचे त्यापेक्षाही जनावरांची मोठी हानी झा ी आहे. असे असताना केवळ राज्यात राजकारण दिसून येत आहे. एकमेकावर शब्दीक चिखलफेक केली जात आहे. पुर्वी पासून शेतकऱ्याकडे लक्ष दिले असते तर शेतकऱ्यांनी जीवन संपविण्याचा विचार मनात आणला नसता. सर्वाधिक जीवन संपविणारे कोण आहेत. याचा विचार केला तर शेतकरी आहेत हे उत्तर मिळू शकेल. शेतकरीच जीवन संपवित आहेत याचा शांत डोक्यांनी सत्ताधारी व विरोधकांनी विचार केला का? आजही या शेतकऱ्यावरच राजकारण खेळत आहात हे योग्य नाही. अनेक विषय आहे. आज देशावर मोठे कर्ज आहे. ठराविकांकडे अफाट संपत्ती आहे. भ्रष्टाचारात कोणते राज्य पुढे आहे या बाबत चिंतन करावे. मुळात शेतकऱ्याबाबत यापुढे बोलताना विचारपुर्वक बोलावे व वागावे. शेतकरी हा स्वतः उपाशी राहून समाजाला पोसतो आहे हे सतत लक्षात ठेवले पाहिजे.

# संस्कृतीचे संस्कार... 'कृती संस्कृती'






**समीक्षण...**

--------------------

आपल्या संस्कृतीचा आत्मा आणि गाभारा आदर्शवत असा आहे. या संस्कृतीच्या गाभाऱ्यात पदार्पण केल्याशिवाय खऱ्या अर्थाने आपल्या संस्कृतीच्या अंतरंगाचे दर्शन घडणार नाही.सम्यक दृष्टीशिवाय संस्कृतीची सृष्टी दिसत नाही. संस्कृतीचे हृदय प्रेमाने बहारलेले, पवित्र, पावित्र्याने सजलेले, त्यागाने, न्यायाने परिपूर्ण माधुर्याने ओथंबलेले, ज्ञानाने भरलेले, आशा, उत्साह, ऊर्जा, प्रयत्न, आदर आणि आनंदाने समृद्ध असे वैविध्यपूर्ण संस्कृतीचे आगार आत्मसात केल्याशिवाय कशी कळेल?

सहृदयता, सहिष्णुता, उदारता, औदार्यता, मानवता, समानता, विशालता, सुंदरता, सत्यता, भव्यता, दिव्यता, कृतार्थता, सार्थकता, शांतता, शिव, संयमता, ज्ञान, विज्ञान, काळोखातून उजेडाकडे, द्वैताकडून अद्वैताकडे, विकासातून विवेकाकडे अशा महत्त्व महत्त मूल्य असणाऱ्या मांगल्याकडे मार्गक्रमण करणारा हा संस्कृती मानवी संसार, सुखमय, आनंदमय करणारी आहे.

'संस्कृती' या शब्दाची व्यापकता थोर आहे, समग्र मानवी जीवन अंतर्बाह्य उन्नत करणारी आहे. 'प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृतीत म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करावयाचा संस्कार. संस्कृती ही आशा विविध रूपे असणारी संकल्पना आहे.' संस्कृती एका अर्थाने चांगले करणे असाही अर्थ होतो. भाव, श्रद्धा, परंपरा, वर्तन, रीतिरिवाज या एक समुच्चय मानवाच्या अंतकरणातील, स्वभावातील स्वाभाविक षड्विकार नियंत्रित, निर्दालन करण्यासाठी संस्कृती ही दिशादर्शक ठरते. समाजातील चालीरीती.. आचार - विचार, परंपरा, विश्वास, निष्ठा या मूल्यांचा संस्कृतीत समाविष्ट होतो. अशा मूल्यातून मानसिक उन्नतीचा मार्ग सापडतो. संस्कृती ही व्यक्ती एका अर्थाने समाजाची जीवनपद्धती असते.

देशकाल जगण्याची संस्कारमय पद्धती आहे. सणवार, व्रतवैकल्ये तसेच सामाजिक संख्या यापासून अगदी बालवयापासून मानसांच्या मनावर व वयावर संस्कार करते. या संस्कार परंपरेलाच 'संस्कृती' म्हणतात. भूक लागणे ही प्रवृत्ती, एकटे खाणे ही विकृती आणि सर्वांना एकत्र करून खाणे अथवा जगणे ही झाली संस्कृती. यातून माणसातील माणुसकीचे यथार्थ दर्शन घडविते.

संस्कृतीचे संस्कारमय आचरण 'कृति - संस्कृती ' या काव्यसंग्रहातून कवयित्री सौ. सुरेखा जमदाडे यांनी सुलभ, सरळ, प्रासादिक भाषेतून भाष्य केले आहे. या काव्यसंग्रहातील लेखन साचेबद्ध स्वरूपाचे नाही. संस्कृती, बालगीत आणि सर्व समावेशक अशा त्रिस्तरीय भागातून हा काव्यसंग्रह वाचकांच्या हाती सुपूर्द केला आहे. संस्कृती आणि वर्तमान समाजाची कृती आणि उक्ती यातील कमालीची भिन्नता यावर कवयित्रेने नेमकेपणाने बोट ठेवले आहे. श्रद्धे शिवाय संस्कृती नाही परंतु संस्कृतीत अंध श्रद्धेला थारा नाही. वर्तमानकालीन परिस्थितीत विसंगती. संभ्रमता प्रकर्षाने जाणवते. देव भक्तीचा भुकेला आहे तो आपल्या अंतकरणात आहे, आपण करत असलेल्या कामात आहे. भक्तीचे अवडंबर, स्तोम सर्वत्र दिसत आहे. ही वास्तवता कवयित्रीने 'देव माझा' या कवितेतून मांडते.

नको धुप अन बत्ती
भाव असतो चित्ती...
धरिता सत्कर्माची कास
तिथे प्रभूचा निवास,
साधु संतही वदले
तिथे भलेही वधले...

अशा साध्या सोप्या भाषेतून कवयित्रीने वर्तमानाचा समाचार घेतलेला आहे. आपल्या संस्कृतीत चराचर महान विचार मांडलेला आहे. अशा चराचरात ईश्वराचे अस्तित्व आणि सानिध्य सामावलेले आहे. 'ठाऊक आहे...' या कवितेतून याचा प्रत्यय येतो. आपले संस्कृती ज्ञानप्रधान आहे. दुर्दैव आहे याचे नव्या पिढीला अजिबात भान नाही. अशामुळे संस्कृतीचे पवित्र व पावित्र्य संपुष्टात आल्याचे दिसते. आजची उत्सव आपापसात वैर निर्माण करणारी ठरत आहेत. आपापसातील जीवघेणी स्पर्धा वाढल्या खऱ्या संस्कारापासून नवीन पिढी नको तेवढे दूर जाताना दिसते.

मूर्ती पुढील सारे
हिडीस प्रकार टाळावे,
उत्सवाचे पावित्र्य
सर्वार्थाने जपावे...

उत्सवातील ध्वनी प्रदूषण कमालीचे जीवघेणे ठरत आहे. पर्यावरण धोक्यात आहे. हिडीस किळसवाना प्रकार याची परिणीती मानवी जीवन अनेक संकटे आणि अनेक व्याधीने त्रस्त आहे. अशा अनेक धोक्याच्या घंटा देणाऱ्या कविता या काव्यसंग्रहात आहेत. सणवार, व्रत, वैकल्य या माणसांच्या जीवन पद्धतीचा अविभाज्य भाग आहे. सणावारातून मानवी जीवनाला उभारी व आनंद प्राप्त होत असतो. आपापसातील आदर, भाव ऋणानुबंध निर्माण होतात. अशा अनेक कविता मधून कवयित्रीने संस्कृतीतील मानवतावादी दृष्टिकोनाचा परामर्ष घेतला आहे. विशेषतः अशा सणावारातून ज्ञान आणि विज्ञानाचा अंतर्भाव कसा आहे हा विचार अधिक महत्त्वाचा वाटतो. माझी माणसं, शेत शिवार, गुरंढोरं या विषयीची असलेली अपार कृतज्ञता व्यक्त होते. गाव - गावातील माणसं यांच्या विषयीची नितांत अदर नितांत आपुलकी आणि आपलेपणा अशा सणवार, परंपरेतून जाणवतो. आपल्या गावाविषयीची ओढ आणि आवड या विषयी कवयित्री सांगते -

गावातला तो भाईचारा
प्रत्येक सोहळ्याला
गाव जमतो सारा
सतत होतो भास
जणू वाट पहातसे वेस
मन आनंदून जाते
निदान यामुळे तरी
गावाकडे जाणे येणे होते...

सणावारामुळे गाव आणि गावातील माणसांची एकी अबाधित राहते नात्यागोत्यातील स्नेहसंबंध, रेशीमबंध, अनुबंध हळुवारपणे घट्ट होतात. वास्तविक पाहता मानवी जीवनातून सणवार वजा केले तर जीवन शुष्क आणि रटाळ होईल. नित्याचे जीवन अशा सणावारातून भेटीगाठी, विसावा, विश्रांतीची ही शीतल स्थळे आहेत.

आपले सण
आपले उत्सव,
हेच आपले
आहे वैभव
सारे जपूया
या संस्कृतीला,
बांधून ठेवतील
नात्यागोत्याला...

मानवतेचा संदेश देणारे हे आपले सणवार आपआपसातील भक्ती आणि शक्ती स्थळे आहेत. 'संक्रात'या कवितेतून भौगोलिक बदलाचे संकेत कसे घडतात. त्या सोबतच तिळ आणि गुळाचा गोडवा यातून शरीराला मिळणारी पोषकता तर आहेच एका अर्थाने विज्ञान आणि मानवतेचा सुरेख संगम घडतो.

विसरावेत मतभेद
क्षण आनंदात घालावेत
मुखातल्या गोडव्याने
मन साऱ्यांचे जिंकावेत...
सर्व नात्यात असावा
भाव माणुसकीचा,
हा एक संदेश
मकर संक्रांतीचा...

'गौराई आली', 'श्रीकृष्ण', 'दुर्वा महात्म्य', 'रिद्धी सिद्धी', 'मोदक', 'मातृभक्त', 'आगतम् स्वागतम्', 'निरोप', अशा अनेक कवितामधून कवयित्रिने आपल्या सणवारा या पाठीमागचे कार्यकारण भाव, धारणा, महत्त्व आणि महात्म्य याचा धांडोळा घेतला आहे. यासोबत कांही भक्तीपर रचनाही या काव्यसंग्रहातून येतात.

पशू, पक्षी, वृक्ष-वनस्पती यांच्याशी ही संस्कृतीचे जीव्हाळ्याचे स्नेहसंबंध आहेत. शेत-शिवार, गुर-ढोर, गायी-वासरे, बैल हा आपला गोतावळा. या विषयीची कतृज्ञतेची भावना आपल्या सणावारातून व्यक्त करत असतो. बैलावर शेतकरी जिवापाड माया करतो. त्याच्या पुण्याईने शेत-शिवार, घर-दार गुण्या गोविंदाने नांदते. आपल्या या गोतावळ्याला मुलाप्रमाणे माया लावणारा हा शेतकरी 'सखा नव्हे पुत्र' या कवितेतून कृतज्ञतेची भावना व्यक्त कवयित्रीने केली आहे.

घालून पाठीवर झूल
रंगवू या शिंग छान
माझ्या हन्नम जोडीला
आज देवाचा हो मान...

चिऊताई, माकडदादा, राघू, मोर, नंदीबैल अशा कवितेतून पशुपक्ष्यांविषयीची आपुलकीची भावना भावपूर्ण शब्दांतून व्यक्त होताना दिसते.

कमळ, सदाफुली, जास्वंद, झाड मला बिलगल अशा निसर्ग कवितेतून वृक्षांच्या अंगभूत गुणधर्मातून माणवी जीवनाला किती उपकारक आहेत हा भाव झाड मला बिलगलं या कवितेतून व्यक्त होतो. झाडाच्या आणि कवयित्रीच्या संवादातून ही कविता आशयघन होते. विकासाच्या नावाखाली आपण लाखो झाडाची कत्तल करत आहोत. वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा असमतोलपणा किंबहुना मानवी जीवनाचा एका अर्थाने ऱ्हास आहे. हा वास्तववादी विचार या कवितेतून येतो. एका अर्थाने वाचकाला अस्वस्थ व अंर्तमुख करणारी ही कविता आहे.

तसं ते रोपट म्हणालं
तू दिलीय उभारी
तर मी तयार आहे,
ताठ उभा आहे, जोवर
परोपकाराची परंपरा
पूर्वजांची माझ्या
मीही जपणार आहे
पर्यावरणाचे रक्षण करणार आहे...

या काव्यसंग्रहातील बालगीते हे या काव्यसंग्रहाचे आणखीन एक वैशिष्ट्ये आहे. 'नात' सारखी कविता अत्यंत भावपूर्ण आहे. कवयित्री आपल्या गोड नातीसोबत आपणही लहान होते. तिच्या निरागास स्वभावात कवयित्री हरवून जाते.

अकडा मकडा
लिंबाला पकडा
खेळ तिचा
असे रांगडा...
आपडी तुपडी
तेलंग तुपडी
सोबतच खेळते
लंगडी अन् फुगडी...

आज पुन्हा, जीवन, भार, नाही जमलं, तू जिंकणार आहेस, थूऽऽ जिंदगी अशा कितीतरी आयुष्या विषयीच्या सखोल चिंतनगर्भ कविता या काव्यसंग्रहातून येतात. मातृदेवभव ही आपली संस्कृती आहे. 'आईबाबा' या कवितेतून कवयित्रीने आपल्या आई वडिलांचे अमरत्व शब्दबद्ध केले आहे. खऱ्या अर्थाने आई वडिल आपल्या आयुष्यातून शरिराने गेले असले तरी ते आपल्या कायमचे सोबतच असतात. त्यांचे अस्तित्व आपण कधीही पुसू शकत नाही. या संदर्भात विचारप्रवंत करणारी कविता अधिकच महत्वाची वाटते. अशा कवितेतून आपल्या संस्कृतीची खरी ओळख पटते ती रचना -

त्यांचं अस्तित्व असतं...
हृदयाच्या स्पंदनात,
डोळ्याच्या ज्योतीत,
वाहणाऱ्या धमन्यात,
अन्, नसनसात,
श्वासात, हालचालीत,
आयुष्याच्या जडणघडणीत...

कवयित्री सौ.सुरेखा जमदाडे यांनी भारतीय संस्कृतीतील वैविध्यता, विविधता याचा शोध आपल्या अनेक कवितांतून घेतला आहे. चराचरातील श्रृष्टीतील प्रत्येक घटकाला या संस्कृतीने सामावून घेतले आहे. निर्मळ हृदयाची गाणे गाणारी ही संस्कृती द्वैत नाही तर अद्वैत आहे. आशा आणि प्रयत्नवादी आहे. माणसाची मने ओळखणारी आहे. माणसाला अमरत्व प्राप्त करून देणारी आहे. सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः अशी महान संदेश देणारी ही संस्कृती संस्कारमय आहे. 'कृती-संस्कृती' या काव्यसंग्रहातील कविता मुक्तछंद, विधानात्मक जरी वाटत असल्या तरी आशयघन आहेत. या काव्यसंग्रहाचे वाचक नक्कीच स्वागत करतील या अपेक्षेसह...!

**-प्रा. डॉ. विजयकुमार करजकर**
**राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर**

### विठ्ठले ..

रस्त्यावर उतरायला
तयार असती सगळे
रस्ता योग्य दाखवून
योगदान देई आगळे

गच्चभरलेले आपले
खिसे करावे मोकळे
फुकट कोरडासल्ला
देवून होतात मोकळे

खजिने आहे रिकामे
कुणांस कसे न कळे
त्याग करा दुस-यांने
आम्ही देणार ढेकळे

एकजूट असे जरूरी
मग का लढावेवेगळे
स्पष्ट संकट कल्पना
उगाच ना काढी गळे

हातसाथ नाही कुणी
आपत्तीग्रस्तकळवळे
अंतस्थ वाद विसरावे
पहाकोण जे विठ्ठले

मागे धावे सोन्याच्या
चकाके काही पिवळे
सोन्यासारखी माणसे
हरवले मोती पोवळे

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## ४० शीत तरुणपणीपेक्षा जास्त सुंदर दिसू शकतात महिला, या ६ गोष्टी करा फॉलो

अलीकडेच लंडनमध्ये एका मॅगझिनने शोध घेतला. हा शो ४० पेक्षा जास्त वय असलेल्या महिलांवर आधारीत होता. यात त्यांनी ४० पेक्षा जास्त वय असताना देखील महिला अधिका सुंदर आणि आकर्षक कसा दिसतात हे सांगितले आहे. सर्वे क्षणात, एका सर्वेक्षणात, चारपैकी तीन महिलांनी कबूल केले की आपल्या पार्टनरसोबत ५० वर्षे रोमँटिक आयुष्य घालवणे हे पालक होण्यापेक्षा जास्त आनंददायी आणि मजेदार आहे. थोडक्यात, काही गोष्टींची काळजी घेतली तर जीवनाचा हा टप्पा आनंददायी ठरू शकतो. काही गोष्टींकडे लक्ष देऊन तुम्ही या वेळेचा पुरेपूर फायदा घेऊ शकता.

जाणून घ्या काय आहे टिप्स

१. नियमित आरोग्य तपासणी

५० नंतर हाडांची ताकद हळूहळू कमी होत असल्याने, हाडांची नियमित तपासणी करणे महत्त्वाचे आहे. सांध्यावरील दबावामुळे संधिवात होऊ शकते, म्हणून हाडांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. हाडांची घनता चाचण्यांसह नियमित आरोग्य तपासणी दर दोन वर्षांनी करणे गरजेचे आहे.

२. महिलांसाठी आवश्यक आरोग्य चाचण्या

महिलांनी नियमितपणे विशिष्ट आरोग्य चाचण्या केल्या पाहिजेत, ज्यामध्ये यूरीन रुटीन और यूरीन कल्चर टेस्ट, अल्ट्रासाउंड पेल्विस टेस्ट ओव्हरी आणि ब्रेस्ट अल्ट्रासाउंड यांचा समावेश होतो. या चाचण्या विविध आरोग्य समस्या लवकर शोधण्यात आणि प्रतिबंध करण्यात मदत करतात.

३. ४० शी नंतर योग्य व्यायाम प्रकार निवडा

तुमच्या उर्जेच्या पातळीनुसार तुमची व्यायामाची दिनचर्या तयार करा. वेगानं चालणे, जॉगिंग, पोहणे आणि आवडत्या खेळात सहभागी होणे फायदेशीर ठरू शकते. तथापि, निवडलेले व्यायाम तुमच्या सध्याच्या शारीरिक स्थितीशी सहन होणारे आहेत की नाही याची सगळ्यात आधी काळजी घ्या.

४. झिंक आणि व्हिटॅमिन बी

सुरकुत्या टाळण्यासाठी तुमच्या झिंकच्या सेवनाकडे लक्ष द्या आणि कॅलरी उर्जेमध्ये रूपांतरित करण्यासाठी तुम्हाला पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन बी मिळेल याची खात्री करा. तुमच्या आहारात बटाटे, टरबूज आणि पपई यांसारख्या पदार्थांचा समावेश करा, जे त्वचेच्या काळजीसाठी बीटा-कॅरोटीनने समृद्ध आहेत.

५. अँटी एजिंग पदार्थांचे सेवन करा

चांगल्या आरोग्यासाठी अपींळ असळपस पदार्थांना समाविष्ट करा. तरुण राहण्यासाठी योग्य पोषणासह संतुलित आहार म हत्त्वाचा आहे.

६. पौष्टिक आहार

वयाच्या ४० नंतर दररोज किमान २०० मिलीग्राम प्रथिने, ३० मिलीग्राम लोह आणि १५०० मिलीग्राम कॅल्शियमचे सेवन करा. प्रथिनांच्या कमतरतेमुळे ऑस्टिओपोरोसिसचा धोका ३०म पर्यंत वाढू शकतो. पालक, टोमॅटो, दूध, स्प्राउटस, अंडी आणि बीट यांचा आहारात समावेश करा.

## सदाबहार आंबा ठरतोय आकर्षणाचा केंद्रबिंदू, वर्षातून तीन वेळा उत्पादन

अलीकडच्या काळात शेतीत सातत्याने नवनवीन प्रयोग होतायेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतकरी भरघोस उत्पन्न घेत आहेत. तसेच पिकांच्या नवनवीन वाणांचा शोध लागल्यानं कमी वेळात अधिक उत्पन्न मिळत आहे. अशीच एक आंब्याची अनोखी जात आहे. ज्या आंब्याला बाराही महिने फळ येते. वर्षातून तीन वेळा आंब्याचं उत्पादन घेता येतं. जाणून घेऊयात आंब्याच्या या सदाबहार जातीबद्दल सविस्तर माहिती.

'थाई १२ मासी' असं या आंब्याच्या जातीचं नाव

उत्तराखंडमधील उधम सिंह नगर येथील आंबा प्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आली आहे. देशातील सर्वात मोठा शेतकरी मेळावा येथे आयोजित केला जातो. या जत्रेत विविध प्रकारच्या पिकांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. यावेळी जत्रेत बारमाही आंब्याच्या विविध जातींचे प्रदर्शन करण्यात आले. या आंब्याच्या झाडापासून तुम्ही वर्षातून तीन वेळा उत्पादन घेऊ शकता. आंबाप्रेमींना वर्षभर या फळाचा आस्वाद घेता येणार आहे. 'थाई १२ मासी' असं या आंब्याच्या जातीचं नाव आहे.

पश्चिम बंगालच्या स्टॉलवर प्रदर्शनात ठेवले होते आंब्याचे झाड

थाई बारमाही आंब्याच्या झाडाला दोन वर्षांत फळे येऊ लागतात. थाई जातीचे बारमाही गोड आंब्याचे झाड पंतनगर येथील अखिल भारतीय शेतकरी मेळाव्यात पश्चिम बंगालच्या स्टॉलवर प्रदर्शनात ठेवण्यात आले आहे. आंब्याच्या या जातीची खास गोष्ट म्हणजे याच्या झाडाला वयाच्या दोन वर्षापासून फळे येऊ लागतात. गोडपणाच्या बाबतीत ते इतर आंब्यांपेक्षा पुढे आहे. याशिवाय हे झाड विषाणूमुक्तही मानले जाते.

हा आंबा आकर्षणाचा केंद्रबिंदू

पंतनगर येथील अखिल भारतीय शेतकरी मेळाव्यात हा आंबा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. थाई प्रकारातील थाई १२ मासी आंबा लोकांच्या पसंतीस उतरला आहे. आंब्याची ही जात वर्षातून तीन वेळा फळ देईल. पाच वर्षांनंतर, आंबा रोपातून एका वर्षात ५० किलोपेक्षा जास्त आंबा पिक घेता येते.

या राज्यात केली जाते आंब्याची शेती

देशातील अनेक राज्यात याची लागवड केली जात आहे. खासगी रोपवाटिकेचे मालक अयान मंडल यांनी सांगितले की, थायलंडची ही प्रजाती बांगलादेशने विकसित केली आहे. याला कटी मन असे म्हणतात. पश्चिम बंगाल, गुजरात, पंजाब, महाराष्ट्र, यूपी येथील शेतकरी त्याची व्यावसायिक शेती करून चांगला नफा कमावतात. शेतकऱ्यांनी लागवडीसाठी योग्य पद्धतीचा अवलंब केल्यास ते बारमाही आंब्याच्या झाडापासून येत्या काही वर्षांत चांगला नफा मिळवू शकतात.

## छोटीशी वेलची आहे बहुगुणी, वेलची चावून खाल्ल्याने आरोग्याला होतो लाभ

आकाराने छोटी असली तरी वेलचीचे अनेक फायदे आहेत. अनेकदा चहामध्ये किंवा मसालेभातात स्वादासाठी व सुवासासाठी वेलचीचा वापर करतात. वेलचीच्या सुवासामुळं पदार्थाची रंगत अजूनच वाढते. अनेकदा मिठाई किंवा गोडाच्या पदार्थांमध्येही वेलची वापरली जाते. वेलचीमध्ये पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्निशियम आणि अँटीऑक्सिडेंटस आढळतात. वेलची खाण्याचे अनेक फायदे आहेत. यालेखात आज आपण वेलचीचे आरोग्यासाठी असणारे फायदे जाणून घेऊयात.

वेलची फक्त चावून खाल्ल्यानेही शरीराला अनेक लाभ मिळतात. वेलची खाल्याने एंजाइम्सचे सिकरिशन स्टिम्यूलेट होतात ज्यामुळं पचन होण्यास मदत होते. तसंच, सूज, गॅस आणि पोटात दुखणेसारख्या समस्या पाचनसंबंधी समस्यांपासून आराम मिळतो.

# आणखी शोधा

**मनाचा गाभारा : अर्चना सरोदे**


**अहंकाराचा वारा न लागो राजसा।**
**माझ्या विष्णुदासा भाविकांसी ।।**
**नामा म्हणे तया असावे कल्याण।**
**ज्या मुखी निधान पांडुरंग ।।**

संत नामदेव महाराज पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना करताना म्हणतात, ''हे देवा, जे विष्णू भक्त आहेत त्यांना अहंकाराचा वारा कधीही लागू देऊ नकोस... ज्यांच्या मुखात सदैव पांडुरंगाचे नाव असते, जे पांडुरंगालाच सर्वस्व मानतात त्यांचे नेहमी कल्याण कर.नुकतीच विजयादशमी झाली. रावणाचे दहन ही झाले. व्हॉट्सप, फेसबुक, इन्स्टा सगळीकडे षड्रिपूचे दहन करा, अहंकाराचे दहन करा अशा पोस्टचा जणू पूर आला होता; परंतु केले जाते का हो खरंच दहन आपल्या अहंकाराचे? किंबहुना आपण त्यासाठी प्रयत्न तरी करतो का? हेही तितकेच महत्त्वाचे... आपण फक्त सल्ले देतो दुसऱ्यांना पण आपण ते अमलात आणतोय का हे बघतच नाही.

आपण दुसऱ्याला जेव्हा एखादा सल्ला देतो तेव्हा त्या गोष्टींबाबत आपण स्वतः किती सचोटीने वागत आहे हे पाहणे गरजेचे नाही का? कसं आहे ना प्रत्येकाला हे दाखवायचं असतं की मी किती खरा आहे, मी कधीच चुकू शकत नाही, माझे वागणे किती बरोबर आहे आणि ते सिद्ध करण्याच्या नादात आपण दुसऱ्याच्या भावना दुखावतोय याची जाणीव सुद्धा आपल्याला होत नाही. हा जो मी आहे ना यालाच म्हणतात अहंकाराचावारा लागणे.

नम्रता विद्येचे भूषण आहे, 'निगर्वता' श्रीमंतीचे भूषण आहे आणि 'क्षमा' बलवंतांचे भूषण आहे. परंतु अहंपणामुळे आपण नेमकं हेच विसरतो किंवा असं म्हणूयात की, आपण सरळ सरळ याकडे दुर्लक्ष करतो आणि दुसऱ्याचा द्वेष, दुसऱ्याची निंदा करण्यात स्वतःला धन्य समजतो. काय योग्य काय अयोग्य याचा कधीच विचार करत नाही. अहंकारामुळे आपल्या मनात दुसऱ्याबद्दल द्वेष निर्माण होतो. द्वेषातून क्रोधाचा जन्म होतो आणि मग माणूस अनितीने वागायला लागतो.

मानवाने नीतिनेच वागले पाहिजे नाही तर एक दिवस विद्या, यश, बल यांचा नाश होतो. म्हणून श्रीसमर्थ रामदास स्वामी म्हणतात, प्राप्त झालेले ज्ञान 'अहंकारामुळे' नष्ट होते. सत्संगती धरून सद्गुणांची वृद्धी होऊन भगवद्कृपा प्राप्त होते.सतत दुसऱ्यांची निंदा करणे, द्वेष करणे, समोरच्याला तुच्छ लेखणे हे मनुष्याला अधोगतीच्या मार्गावर घेऊन जाते. पण काय आहे ना अहंकारी माणसाला आपण अहंकारी आहोत हे तर



आधी कळले पाहिजे ना आणि जर त्याला नसेल कळत आणि कोणी समजवायला गेलं तर ते त्याला पटल तर पाहिजे ना. म्हणूनच आपल्याला अहंकाराचा वारा लागलाय का याचे आत्मपरिक्षण ज्याचं त्याने वेळोवेळी केले पाहिजे. अहंकार हा संसार, समाज, आयुष्याच्या नाशाचे कारण आहे. संत कबिरांनी आपल्या दोह्यात म्हटले आहे,

'मैं मैं बडी बलाई है,
सके निकल तो निकले भाग ।
कहे कबीर कब लग रहै,
रुई लपेटी आग ।।'

हे मानवा अहंकार हा एक मोठा रोग आहे. त्यातून मुक्त होण्याचा प्रयत्न कर. कारण मी-मी ही अशी ठिणगी आहे जी तुझं सगळं आयुष्य भस्म करून टाकेल. एक ना एक दिवस सर्वांनाच हा जीवनाचा प्रवास सोडून परलोकाचा प्रवास सुरू करायचा आहे मग कशासाठी आपण हा मी पणाचा, मोठेपणाचा अट्टाहास करतो. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता चांगले कर्म करत असताना जे नाव तुम्ही कमावता तेच चिरकाल टिकून राहतं. तुम्ही केलेली चांगली कर्मे आणि भगवंताचे नामस्मरण हेच या जगात चिरंतन राहणार आहे. मी श्रेष्ठ असल्याचा अट्टाहास करत राहणे हा देखील अहंकाराचाच एक भाग आहे. आपणच सर्वश्रेष्ठ आहोत असे समजत असताना आपल्या मनात असुरक्षिततेची भावना येत असेल, तर मग का आपण वृथा अभिमान बाळगावा आपल्या श्रेष्ठत्वाचा. अशावेळी आपण समजावे की आपल्याला अहंपणाची बाधा झाली आहे. यावर एकच उपाय तो म्हणजे स्वतःचे आत्मपरिक्षण करणे.

एखादा जर चांगल्या मार्गावर जाण्याचा प्रयत्न करत असेल तर आपण लगेच कुत्सितपणे म्हणतो की त्याला ब्रम्हज्ञान प्राप्त झाले आहे. पण ब्रम्हज्ञान म्हणजे नक्की काय हो? माझं वैयक्तिक मत विचाराल तर ब्रह्मज्ञान म्हणजे षड्रिपूंचे दहन करून इंद्रियांवर विजय मिळवणे. आपल्या चुकांची कबूली, दुसऱ्यांच्या चुकांना क्षमा आणि कोणालाही तुच्छ न लेखणे हेच ब्रह्मज्ञान आहे. या गोष्टी समजून घेतल्या तर आपल्याला अहंकाराचा वारा कधीही लागू शकत नाही.

दुसऱ्यांशी स्पर्धा न करता आपण आपली स्वतःशीच स्पर्धा केली पाहिजे. जेव्हा आपण आदराने व अदबीने वागू, मीच श्रेष्ठ आणि समोरचा तुच्छ हा अहंभाव सोडायला शिकू, दुसऱ्याची स्पर्धा न करता आत्मपरिक्षण व निस्वार्थ कर्म करायला लागू तेव्हा समजायचं आपण हळूहळू अहंकाराचे दहन करण्यात यशस्वी होत आहोत. मन:शांतीसाठी देवाचं नामस्मरण करत राहिल्याने गर्व, घमेंड व अहंकार यांना आपण प्रयत्नपूर्वक दूर ठेवू शकतो. तेव्हाच आपले मन खऱ्या अर्थाने सदैव प्रसन्न राहील.

## आरोग्य हीच खरी संपत्ती



**शरीराला निरोगी ठेवा, तर मनही निरोगी राहील. सकारात्मकता ही यशाची पहिली पायरी आहे; ती तुमच्या मनात सदैव जोपासा.**
**आजची काळजी उद्याला आरोग्य देते.**
**मजबूत व्हा, योग्य खा. आपण काय खातो हे महत्त्वाचे आहे. निरोगी निवडी करा.**
**आपले आरोग्य आपल्या हातात आहे; त्याची काळजी घ्या.**

# वादग्रस्त मचाडो



यंदा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या राजनैतिक नेत्या मारिया कोरोना मचाडो यांना जाहीर झाला आहे. मचाडो यांनी व्हेनेझुएलाच्या लोकांसाठी लोकशाही अधिकारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि न्यायपूर्ण आणि शांततामय पद्धतीने हुकूमशाही प्रवृत्तींना विरोध करून त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला असे नोबेल समितीने म्हटले आहे. अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेकदा या पुरस्काराचे आपण मानकरी आहोत, असे सांगितले आहे. त्यांनी म्हटले होते, की भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध त्यांनी अनेकदा थांबवले आहे आणि त्यांनी असेही सांगितले होते, की सध्या रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्ष थांबवण्यासाठीही आपण प्रयत्न केले आहेत. ट्रम्प यांना डावलून मचाडो यांना पुरस्कार जाहीर झाला. कारण अल्फ्रेड नोबेल यांच्या विचारसरणीनुसार पुरस्कार दिले जातात, असे पुरस्कर्त्यांनी म्हटले होते. त्यामुळे एक हुकूमशहा वृत्तीचे ट्रम्प यांच्यापुढे नोबेल पुरस्कार समिती झुकली नाही, याबद्दल तिचे अभिनंदन करावे लागेल. पण ज्या बातम्या येत आहेत त्यावरून मचाडो यांच्यावरही टीका होत आहे. निकोलस मादुरो सरकारविरोधात अनेक वर्षांपासून आवाज उठवत आहेत, पण मादुरो सरकारने त्यांना निवडणुका लढवण्यापासून वंचित केले होते. कारण २०२३ मध्ये झालेल्या निवडणुका निष्पक्ष नव्हत्या असा दाव केला. मारिआ मचाडो यांना व्हेनेझुएल-ातील लोकशाहीला प्रोत्साहन दिल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला. असे असले, तरीही व्हेनेझुएलातील बऱ्याच नागरिकांना माहीत आहे, की मचाडो यांनी लोकशाहीच्या आविर्भावात निर्बंध, खासगीकरण आणि परकीय हस्तक्षेपाचे भलामण केले आहे. त्यामुळे त्यांना पुरस्कार जाहीर झाल्यावर व्हेनेझुएलात आनंदाची लाट उसळली नाही आणि म्हणावा तसा जल्लोष साजराझाला नाही.

ट्रम्प हे तर हुकूमशाहा आहेतच पण मचाडो याही एकप्रकारे हुकूमशाहीच्याच पुरस्कर्त्या आहेत ही भावना व्हेनेझुएलाच्या नागरिकांमध्ये आजही कायम आहे. शांततेचा पुरस्कार मचाडो यांना देण्यात आला आहे, त्या मचाडो यांचे राजकारण हिंसाचाराने भरलेले आहे असे कित्येक बुद्धीजीवींचे मत आहे. मचाडो यांनी बेंजामिन नेतन्याहू यांना आवाहन केले होते, की व्हेनेझुएलाला मुक्त करण्यास मदत करावी. या पार्श्वभूमीवर त्यांना पुरस्कार देण्यात येतो ही देखील निश्चितच अस्वस्थ करणारी बातमी आहे. आतापर्यंत शांतता पुरस्कार मिळालेल्या कोणत्याही नेत्याविरोधात इतके मतप्रदर्शन कधी झाले नव्हते. मचाडो यांचा इतिहास असा आहे, की त्यांनी २००२ मध्ये लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या राष्ट्रपतींना उलथवून टाकण्यास मदत केली.

संविधान नष्ट केले आणि प्रत्येक सार्वजनिक संस्था रातोरात नष्ट केली. अशा राजसत्तेला मचाडो यांनी पाठिंबा दिला असे बोलले जाते, असाही आरोप आहे. मचाडो यांनी अमेरिकन निर्बंधांची पाठराखण केली आणि त्यामुळे व्हेनेझुएलातील गरीब आणि अपंग आणि कामगार यांना आजही त्याची किंमत चुकवावी लागत आहे. इतके असूनही मारिओ मचाडो यांना पुरस्कार का देण्यात आला? तर व्हेनेझुएलातील हुकूमशाहीतून लोकशाहीकडे संक्रमण आणि तेही शांततापूर्ण मार्गाने करण्यात आल्याबद्दल जे कार्य केले त्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे. मचाडो यांनी तथाकथित व्हेनेझुएलातील कठपुतळी सरकार प्रस्थापित करण्यास मदत केली, असाही त्यांच्यावर आरोप आहे. जेरूसलेममध्ये मचाडो यांनी पुन्हा व्हेनेझुएलाचा दूतावासा सुरू करण्यासाठी पुन्हा प्रयत्न केले, असाही त्यांच्यावर आरोप आहे. मचाडो यांनी २०१४ मध्ये अशा निदर्शनांत सहभाग घेतला, की जी निदर्शने शांततापूर्ण नव्हती. मचाडो या लोकशाहीच्या पुरस्कर्त्या वाटत असल्या तरीही त्या फॅसिसम, झिओनिझम आणि नव उदारमतवाद यांचे प्रतीक मानल्या जातात असा त्यांच्यावर अनेकांचा आरोप आहे. या सर्व आरोपांच्या पार्श्वभूमीवर त्यांचा पुरस्कार तपासला गेला पाहिजे.

अर्थात त्यांच्या कार्याचे मोल यामुळे कमी होत नाही, त्यांनी अत्यंत विपरित परिस्थितीत व्हेनेझुएल-ातील लोकशाही आणि तेथील लोकांच्या भावनांना जपत लोकशाही प्रस्थापित केली हे विसरून चालणार नाही. कारण व्हेनेझुएला हा देश खरेतर अत्यंत गरीब देश होता. पेट्रोलचे साठे सापडल्याने तो श्रीमंत झाला. त्यांनंतर तेथील लोकांना लोकशाही आणि आपली पूर्वीची गरिबी कशाचीच बूज वाटेनाशी झाली होती. निकोलस मादुरो यांचा हाच तो काळ. पण त्यानंतर व्हेनेझुएलाच्या नागरिकांना इतकी गरिबी आली, की लोकांना अन्नासाठीही वणवण करावे लागले. दोन्ही काळ देशाने पाहिले आहेत. त्या परिस्थितीत लोकशाहीच्या हक्कांसाठी लढणाऱ्या मचाडो यांना लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी ही जागतिक शांततेचा पुरस्कार देण्यात आला. मचाडो यांना पुरस्कार देण्यात आला, कारण त्यांनी लोकशाहीची ज्योत तेवत ठेवली आहे. हे नोबेल समितीचे भाष्य पुरेसे बोलके आहे. आल्फ्रेड नोबेल यांनी म्हटले होते, की शांतता पुरस्कार त्याच व्यक्तींना देण्यात येतो ज्यांनी देशांदेशांतील बंधुत्वासाठी सैन्याची कपात आणि शांतता परिषदांचे आयोजन करण्यात पुढाकार घेतो. या सर्व बांबींवर मचाडो या आघाडीवर आहेत आणि त्यांचे टीकाकार काहीही म्हणोत, पण मचाडो यांनी आज व्हेनेझुएलाचे नाव जागतिक शांतता पुरस्कारावर कोरले आहे. मचाडो यांचे विरोधक काहीही म्हणत असले तरीही नोबेल यांनी घालून दिलेल्या निकषांचे पालन करत असल्याने त्यांना पुरस्कार देण्यात आला हेच सत्य आहे.

मचाडो या आयर्न लेडी म्हणून ओळखल्या जातात, त्यांनी मला धक्का बसला आहे अशी प्रतिक्रिया दिली. ५८ वर्षीय मचाडो या पारदर्शक लोकशाहीसाठी मोहीम राबवतात. त्यांच्या दृष्टीने वजाबाकीची बाजू म्हणजे त्या उदारमतवादी सुधारणाचे समर्थन करतात. त्यांचा लढा हा आयुष्यभर निकोलस मादुरोविरोधात राहिला आणि त्यांनी मादुरो राजवटीविरोधात लोकांना एकत्र आणण्यात पुढाकार घेतला. या दृष्टीने त्यांची तुलना आँगसान स्यू की यांच्याशी केली जाऊ शकते. मचाडो यांना मादुरो समर्थकांनी धमक्या दिल्या आहेत आणि त्यांचे जिणे हलाखीचे करून टाकले आहे. पण या संघर्षात त्यांनी लोकशाहीची ज्योत तेवत ठेवण्याचे काम केले आहे आणि हीच त्यांच्या पुरस्काराचे महत्त्व सांगणारी बाब आहे. सध्या त्या भूमिगत आहेत.

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? — डॉक्टर टीप्स

### स्ट्रॉबेरी

जेव्हां आपण फळांचा विचार करतो तेव्हा स्ट्रॉबेरी त्वचेकरता आणि स्वस्थ त्वचेकरता सगळयात जास्त



लाभदायक आहे. स्ट्रॉबेरी अँटी एजिंग व्हिटामीन सी ने पुरेपुर असते ज्यामुळे चेहे-यावर सुरकुत्या पडत नाहीत आणि कोरडया त्वचेपासुनही मुक्ती मिळते. व्हिटामीन सी पेस्की मुक्त रॅडिकल्स आणि अणुंशी लढण्यात साहाय्यक आहेत जे आपल्या त्वचेला हानी तर पोहोचवतातच आणि लवकर वृध्द देखील बनवतात.

स्ट्रॉबेरी ला खाण्याऐवेजी तुम्ही याचा उपयोग स्ट्रॉबेरी फेस मास्क च्या रूपात देखील करू शकतात.........(क्रमश. )

## विनोद




अजय : माझे घड्याळ एक मिनिटसुद्धा मागे-पुढे जात नाही.
विजय : वा ! छान. कुठं विकत घेतलंस?
अजय : अरे कसलं छान, घेतल्यापासून बंदच आहे.

## संदेश

Banta dairy likh raha tha "aaj meri behan ko baccha hone wala hai pata nahi ladka hoga ya ladki, isliye mujhe ye bhi pata nahi ki me mama banunga ya mami".

## सुविचार




पुष्कळ वेळा अबोल नजरही बोलकी असते.
– ओव्हिड

**संस्कृत सुभाषित**
**प्राणाः प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून ।**
**विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम्।।**

**मराठीत अर्थ**
अन्न हे सर्व प्राणीमात्रांचे जणू प्राणच ठरते पण अयोग्य अन्न सेवन केल्यास तेच विष बनून प्राणांचे हरण करते परंतु विचाराने व युक्तीवादाने अन्न ग्रहण केल्यास अयोग्य अन्नसुद्धा उपकारक रसायन ठरते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

### उभे शब्द

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

### आडवे उत्तर

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

### उभे उत्तर

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरा-नजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखव-ालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### इंग्लंडच्या कर्णधाराने घडवला इतिहास! महिला क्रिकेटमध्ये 'हा' रेकॉर्ड करणारी ठरली जगातील पहिलीच क्रिकेटपटू

मुंबई-आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत वेस्टइंडिजचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. शनिवारी झालेल्या सामन्यात इंग्लंड आणि श्रीलंका हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेवर ८९ धावांनी विजय मिळवून विजयाची हॅट्रीक पूर्ण केली. या सामन्यात इंग्लंडची स्टार अष्टपैलू खेळाडू नॅट शिवर ब्रंटने दमदार कामगिरी केली. तिने इंग्लंडकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना ११७ धावांची दमदार खेळी केली. हे तिच्या वर्ल्डकप कारकिर्दीतील ५ वे शतक ठरले आहे. दरम्यान या खेळीच्या बळावर इंग्लंडने ५० षटकांअखेर ९ गडी बाद २५३ धावा केल्या.

श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी २५४ धावा करायच्या होत्या. या धावांचा बचाव करतानाही नॅट शिवर ब्रंटने मोलाचं योगदान दिलं. तिने धावांचा बचाव करताना ५ षटकं गोलंदाजी केली. यादरम्यान तिने अवघ्या २५ धावा खर्च केल्या आणि १ फलंदाजाला बाद करत माघारी धाडलं. तर कर्णधार सोफी एक्लेस्टनने १० षटक गोलंदाजी केली आणि अवघ्या १७ धावा खर्च करत ४ गडी बाद केले. या सामन्यात दमदार कामगिरी करून नॅट शिवर ब्रंटने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासात पाचव्यांदा असे घडले

या अष्टपैलू कामगिरीच्या बळावर नॅट शिवर ब्रंटने मोठ्या विक्रमला गवसणी घातली आहे. तिने या स्पर्धेत शतक आणि गोलंदाजी करताना २ गडी बाद करण्याचा पराक्रम केला आहे.

**

### गिलच खरा व्हिलन! यशस्वीची चूक नव्हतीच, रोहितचा व्हिडीओ आला समोर

दिल्ली-दिल्लीच्या अरुण जेठली स्टेडियमवर वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी या युवा भारतीय सलामीवीर यशस्वी जयस्वालकडून अपेक्षा खूप होत्या, पण जयस्वालने स्वत:च्या पायावर दगड मारला. यशस्वीने मिड ऑनच्या दिशेने बॉल मारला. त्यामुळे रन घेयचा की नाही, हे स्ट्राईकवर असलेल्या खेळाडूचा कॉल असतो. यशस्वीने पळ म्हणून घाई केली अन् शुभमनने धाव घेतली नाही. अशातच चूक कुणाची होती? असा सवाल विचारला जात असताना रोहित शर्माचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे.

शुभमन गिलच्या चुकीमुळे द्विशतक हुकलं?

यशस्वी जयस्वालचं द्विशतक हुकलं. यशस्वी जयस्वाल १७५ धावांवर रनआऊट झाला. यशस्वीच्या रुपात टीम इंडियाचा तिसरी विकेट गेली. यशस्वी २५८ बॉलवर २२ फोरसह १७५ धावा काढल्या. वेस्ट इंडिजविरुद्ध दुसऱ्या दिवशी भारताने २ बाद ३१८ धावांवर आपला डाव पुन्हा सुरू केला, परंतु संघाने लवकरच यशस्वीची विकेट गमावली. मात्र, शुभमन गिलच्या एका चुकीमुळे यशस्वीचं द्विशतक हुकलं असं मानलं जातंय. अशातच रोहित अन् गिल यांचा जुना व्हिडीओ व्हायरल होतोय.

रोहित शर्माला रनआऊट, शुभमन पळाला नव्हता

सध्या सोशल मीडियावर रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांचा मागील वनडे वर्ल्ड कपमधील व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये शुभमन गिल याने रोहित शर्माला रनआऊट केले होते. रोहितने पळ म्हणून कॉल दिला होता तरी देखील शुभमन पळाला नव्हता.

***

### भारताविरुद्धच्या कसोटीत तिसऱ्या दिवसअखेर विंडीज ९७ धावांनी पिछाडीवर

नवी दिल्ली-भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा आणि शेवटचा सामना दिल्लीच्या जेटली स्टेडियमवर सुरू आहे. याआधीचा अहमदाबादचा कसोटी सामना भारताने एक डाव आणि १४० धावांनी जिंकला आहे. आता दिल्लीच्या कसोटीत तिसऱ्या दिवसअखेर विंडीज ९७ धावांनी पिछाडीवर आहे. यामुळे भारताची बाजू सध्या वरचढ दिसत आहे. दिल्ली कसोटीत नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेणाऱ्या भारताने पाच बाद ५१८ धावा करुन पहिला डाव घोषीत केला. नंतर विंडीजचा डाव २४८ धावांत आटोपला. फॉलोऑन मिळाल्यामुळे पुन्हा फलंदाजीसाठी आलेल्या वेस्ट इंडिजने तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत दोन बाद १७३ धावा केल्या. अद्याप वेस्ट इंडिज ९७ धावांनी पिछाडीवर आहे. शाई होप ६६ आणि जॉन कॅम्पबेल ८७ धावांवर खेळत आहे. मोहम्मद सिराजने टी. चंदरपॉलला (१० धावा) शुभमन गिलकरवी झेलबाद केले तर ॲलिक अथानाझे सात धावा करुन वॉशिंग्टन सुंदरच्या चेंडूवर त्रिफळाचीत झाला. वेस्ट इंडिजकडून पहिल्या डावात ॲलिक अथानाझेने सर्वाधिक ४१ धावा केल्या होत्या. कॅम्पबेलने १०, चंदरपॉलने ३४, होपने ३६, कर्णधार असलेल्या चेसने शून्य, यष्टीरक्षक इमलाचने २१, ग्रीव्हजने १७, पिअरेने २३, वॉरिकनने १, सीलसने १३ आणि फिलिपने नाबाद २४ धावांचे योगदान दिले. भारताकडून कुलदीप यादवने पाच, रवींद्र जडेजाने तीन तर मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराहने प्रत्येकी एक विकेट घेतली.

भारताची फलंदाजी-भारताने पहिल्या डावात पाच बाद ५१८ धावा केल्या आणि डाव घोषीत केला.

# भारताचा ऑस्ट्रेलियाकडून ३ गडी राखून पराभव

**३३० धावा करूनही भारताचा पराभव अटळ ▶ कर्णधार एलिसा हीलीचे विक्रमी शतक ▶ स्मृती मंधानाच्या सर्वाधिक ८० धावा**

**विशाखापट्टणम:** आयसीसी महिला विश्वचषक २०२५ मधील एका अत्यंत रोमहर्षक आणि हाय-स्कोअरिंग सामन्यात, भारतीय महिला संघाला ३३० धावांचे मोठे लक्ष्य देऊनही गतविजेत्या ऑस्ट्रेलियाकडून ३ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हीलीने १४२ धावांची (१०७ चेंडू) विक्रमी शतकी खेळी करत एकहाती सामना खेचून आणला आणि भारताच्या वर्ल्ड कप मोहिमेला मोठा धक्का दिला.

नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारताने ४८.५ षटकांत सर्वबाद ३३० धावा केल्या. महिला वनडे विश्वचषकात भारतानने नोंदवलेली ही सर्वात मोठी धावसंख्या आहे. स्मृती मंधाना (८०) आणि प्रतिका रावल (७५) यांनी १५५ धावांची विक्रमी सलामी दिली. हरलीन देओल (३८), जेमिमा रॉड्रिग्स (३३) आणि रिचा घोष (३२) यांनीही महत्त्वाचे योगदान दिले. अनाबेल सदरलँड (५/४०) आणि सोफी मोलिनिउक्स (३/७५) यांनी भारताला ५० षटके पूर्ण करू दिले नाही, पण तोपर्यंत भारताने मोठी धावसंख्या उभारली होती.

३३१ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. कर्णधार एलिसा हीलीने ४० धावा करणाऱ्या फोबी लीचफिल्डसोबत ८५ धावांची भागीदारी केली आणि त्यानंतर आपली आक्रमकता कायम ठेवली. हीलीने केवळ ८४ चेंडूत आपले शतक पूर्ण केले आणि भारताच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. तिने १०७ चेंडूत १४२ धावांची धडाकेबाज खेळी केली, ज्यात १७ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. हीलीने महिला विश्वचषकात भारताविरुद्ध केलेली ही सर्वात मोठी वैयक्तिक धावसंख्या आहे.

हीली बाद झाल्यानंतर भारताने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला आणि ऑस्ट्रेलियाचे लागोपाठ तीन विकेट्स (हीली, मॅकग्रा, गार्डनर) झटपट काढले. मात्र, ऑस्ट्रेलियाची अष्टपैलू खेळाडू श्ले गार्डनरने महत्त्वपूर्ण ४५ धावांची खेळी करत संघाचा विजय जवळपास निश्चित केला. अखेरीस, ऑस्ट्रेलियाने १ षटक बाकी असताना ७ गडी गमावून लक्ष्याचा यशस्वी पाठलाग केला.

हीलीची धडाकेबाज फलंदाजी हाच ऑस्ट्रेलियाच्या विजयाचा मुख्य आधारस्तंभ ठरला. ३३० धावांचे मोठे लक्ष्य असतानाही भारतीय गोलंदाज सुरुवातीला प्रभावी मारा करू शकले नाहीत, ज्यामुळे ऑस्ट्रेलियाला चांगली सुरुवात मिळाली आणि आवश्यक रनरेट नियंत्रणात ठेवता आला. भारताने ३६ धावांमध्ये आपले अखेरचे ६ बळी गमावले, ज्यामुळे संघ ३५० पर्यंत जाऊ शकला नाही. या कमी पडलेल्या २०-२५ धावा निर्णायक ठरल्या.या पराभवाने भारतीय संघाच्या वर्ल्ड कप मोहिमेला दुसरा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियाने मात्र आपली विजयी मालिका कायम ठेवत वर्ल्ड कपमधील आपली दावेदारी अधिक मजबूत केली



## दुबळ्या नामिबियाने बलाढ्य द. आफ्रिकेला हरवले



विंडहोक : क्रिकेट जगतात नामिबियाने एक मोठा उलटफेर केला आहे. नामिबियाने त्यांच्याच घरच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या एकमेव टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ४ गडी राखून पराभव करून इतिहास रचला आहे.

या विजयामुळे नामिबियाने क्रिकेट जगतात एक मोठी नोंद केली आहे. हा सामना नामिबिया क्रिकेट ग्राउंड विंडहोक येथे खेळवण्यात आला होता.

क्विंटन डी कॉकचे पुनरागमन ठरले अपयशी

दक्षिण आफ्रिकेचा यष्टीरक्षक फलंदाज क्विनटन डी कॉक (टींळपींप वश घेलज्ञ) या सामन्यातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतला होता, पण तो केवळ १ धाव काढून बाद झाला. दक्षिण आफ्रिकेचा संघ प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी गमावून १३४ धावा करू शकला. नामिबियाकडून रुबेन ट्रंपलमनने उत्कृष्ट गोलंदाजी केली, त्याने २८ धावा देऊन ३ बळी घेतले.

नामिबियाचा थरारक विजय

१३५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नामिबियाने २० षटकांत ६ गडी गमावून १३८ धावा केल्या आणि ४ गडी राखून विजय मिळवला. नामिबियाला शेवटच्या षटकात विजयासाठी ११ धावांची गरज होती. यष्टीरक्षक फलंदाज झेन ग्रीनने (नरपश ऋशशप) चौकार मारून संघाला विजय मिळवून दिला.

झेन ग्रीनने २३ चेंडूंमध्ये नाबाद ३० धावांची खेळी केली, तर कर्णधार गेरहार्ड इरास्मसने २१ धावांचे योगदान दिले. हा विजय नामिबियासाठी खूप महत्त्वाचा आहे, कारण नामिबियाने

## शुभमन गिलने रचला इतिहास

**डब्ल्यटीसी मध्ये तोडला रोहित शर्माचा विक्रम**

मुंबई: भारतीय कर्णधार शुभमन गिल टेस्ट क्रिकेटमध्ये जबरदस्त फॉर्म दाखवत आहे. गिलने वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात शानदार शतक झळकावले आहे. गिलचे हे कसोटी क्रिकेटमधील १० वे शतक आहे. या शतकामुळे त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे.

थढउ मध्ये गिलने मोडला रोहित शर्माचा विक्रम

शुभमन गिल आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या इतिहासात सर्वाधिक शतके झळकावणारा भारतीय फलंदाज बनला आहे. गिलने या बाबतीत माजी कर्णधार रोहित शर्मा याचा विक्रम मोडला आहे.

गिलने थढउ मध्ये आतापर्यंत



१० शतके झळकावली आहेत. रोहित शर्माने थढउ मध्ये ९ शतके झळकावली होती. याच शतकी खेळीमुळे, शुभमन गिल थढउ मध्ये सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाजही बनला आहे. कर्णधार म्हणून विराट कोहलीच्या 'या' क्लबमध्ये सामील

शुभमन गिलने कर्णधार म्हणून २०२५ या कॅलेंडर वर्षात ५ वे कसोटी शतक पूर्ण केले आहे. या कामगिरीसह गिलने विराट कोहलीच्या खास विक्रमाची बरोबरी केली आहे. एका कॅलेंडर वर्षात कर्णधार म्हणून सर्वाधिक कसोटी शतके झळकावणाऱ्या भारतीयांमध्ये गिलने विराट कोहलीची बरोबरी साधली आहे.विराटने २०१७ आणि २०१८ मध्ये दोन वेळा ही कामगिरी केली होती.

दुसऱ्या कसोटीत गिलची कामगिरी

वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत कर्णधार शुभमन गिलने नाबाद १२९ धावांची खेळी केली. त्याने या दरम्यान १६ चौकार आणि २ षटकार मारले.

## हार्दिक पांड्या आणि अभिनेत्री माहिका शर्माचे नाते चर्चेत



**मुंबई :** टीम इंडियाचा अष्टपैलू क्रिकेटपटू हार्दिक पांड्या पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. नुकतेच हार्दिक आणि मॉडेल-अभिनेत्री माहिका शर्मा यांचा एक व्हिडिओ आणि काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यामुळे दोघांचे नाते लक्ष वेधून घेत असून, त्यांच्या अफेअरच्या चर्चांना नवे वळण मिळाले आहे.विमानतळावर दोघेही एकत्र पाहिल्यानंतर, अनेकांनी अंदाज लावायला सुरुवात केली की हार्दिक आणि माहिकामध्ये खास नातं आहे. त्यानंतर हार्दिक पांड्याने इंस्टाग्रामवर काही फोटो शेअर करत या चर्चांना आणखी बळ दिलं आहे. या फोटोंमध्ये हार्दिक आणि माहिका समुद्रकिनाऱ्यावर एकत्र वेळ घालवताना दिसत आहेत. एका फोटोमध्ये हार्दिक तिच्या खांद्यावर हात ठेवून उभा आहे, तर दुसऱ्या ब्लॅक अँड व्हाईट फोटोमध्ये दोघेही एकत्र पोज देताना दिसत आहेत.

## स्मृती मान्धनाने मोडला विराट कोहलीचा सर्वात मोठा रेकॉर्ड



दिल्ली,१२ ऑक्टोबर (पीएसआय) आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत भारतीय संघाचा सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध पार पडला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ३३१ धावांचा डोंगर उभारला. या डावात स्मृती मान्धनाने ६६ चेंडूत ८८ धावांची खेळी केली. या खेळीसह तिने वनडे क्रिकेटमध्ये ५००० धावांचा पल्ला गाठला आहे. यासह तिच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.

स्मृती मान्धनाने मोडला विराट कोहलीचा विक्रम

स्मृती मान्धनाने वनडे क्रिकेटमधील ११२ व्या डावात ५००० धावांचा पल्ला गाठला आहे. यासह तिने मोठ्या विक्रमात विराट कोहलीला मागे टाकलं आहे. याआधी हा विक्रम विराट कोहलीच्या नावावर होता. विराट कोहलीने वनडे क्रिकेटमधील ११४ व्या डावात ५००० धावांचा पल्ला गाठला होता. आता सर्वात जलद ५००० धावा करण्याचा विक्रम हा स्मृती मान्धनाच्या नावावर नोंदवला गेला आहे. या यादीत भारताचा माजी फलंदाज शिखर धवन तिसऱ्या स्थानी आहे. शिखर धवनने वनडे क्रिकेटमधील ११८ व्या डावात ५००० धावा करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला होता. या विक्रमासह स्मृती मान्धनाच्या नावे आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. स्मृती मान्धनाने हे झळकावलेले अर्धशतक हे ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळताना झळकावलेले सलग ५ वे अर्धशतक ठरले आहे. यासह तिने सलग ५ अर्धशतकं झळकावण्या विक्रम आपल्या नावावर केला आहे.

यासह स्मृती मान्धनाच्या नावे आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. स्मृती मान्धना ही महिलांच्या वनडे क्रिकेटमध्ये ५००० धावांचा पल्ला गाठणारी दुसरी भारतीय फलंदाज ठरली आहे. तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पाचवी फलंदाज ठरली आहे. ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या सामन्यात ५८ धावा करताच तिने हा विक्रम आपल्या नावावर केला. यासह तिच्या नावाने आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. महिलांच्या वनडे क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५००० धावांचा पल्ला गाठणारी महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

# स्मृती मन्धानाच्या नावावर खास विक्रम; ऑस्ट्रेलियाविरुद्ध ओलांडला टप्पा



दिल्ली,-भारतीय संघाची आघाडीची सलामीवीर स्मृती मन्धानाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडेत एक खास विक्रम नावावर केला आहे. वूमन्स वर्ल्डकप स्पर्धेत भारताचा आज ऑस्ट्रेलियाशी मुकाबला सुरू आहे. या लढतीत स्मृतीने महत्त्वपूर्ण विक्रम नावावर केला. कॅलेंडर वर्षात १००० धावांचा टप्पा ओलांडणारी स्मृती महिला क्रिकेटमधली पहिली बॅट्समन ठरली आहे. हा टप्पा गाठण्यासाठी स्मृतीला १८ धावांची आवश्यकता होती. ऑस्ट्रेलियाविरुद्ध सोफी मोलिनक्सच्या गोलंदाजीवर षटकार खेचत स्मृतीने हा दुर्मीळ विक्रम नावावर केला.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या लढतीत स्मृतीने वर्ल्डकपदरम्यान सर्वाधिक धावांचा बेलिंडा क्लार्कचा विक्रम मोडला होता.स्मृतीचा हा तिसरा वनडे वर्ल्डकप आहे. २०१७ मध्ये भारतीय संघ जेतेपदाच्या अतिशय समीप होता. स्मृती त्या भारतीय संघाचा भाग होती. वनडे क्रिकेटमध्ये स्मृतीच्या नावावर ५००० धावा आहेत. हा विक्रम नावावर असणारी ती केवळ दुसरी भारतीय महिला खेळाडू आहे. महिला क्रिकेटमध्ये हा टप्पा केवळ पाचच खेळाडूंनी ओलांडला आहे.

स्मृतीला वर्ल्डकपमधल्या तीन लढतीत लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. स्मृतीला श्रीलंकेविरुद्ध (८), पाकिस्तान (२३), दक्षिण आफ्रिका (२३) तीन लढतीत मोठी खेळी करता आली नाही. स्मृतीला मोठी खेळी करता न आल्याचा परिणाम भारतीय संघाच्या कामगिरीवरही पाहायला मिळाला. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता.

आयसीसी महिला विश्वचषक २०२५ मधील १३व्या सामन्यात भारतीय महिला संघाने बलाढ्य ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ३३१ धावांचे विशाल लक्ष्य ठेवले आहे. डॉ. वाय.एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हिडीसीए क्रिकेट मैदानावर झालेल्या या सामन्यात भारताच्या सलामीच्या फलंदाजांनी केलेल्या दमदार खेळाच्या बळावर हा विक्रमी स्कोर उभारला. ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हीलीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, भारताच्या सलामीवीर स्मृती मंधाना आणि प्रतिका रावल यांनी तिच्या या निर्णयाला चुकीचे ठरवले. स्मृती मंधाना (८०) आणि प्रतिका रावल (७५) यांनी भारताला जबरदस्त सुरुवात करून दिली. या दोघींनी पहिल्या विकेटसाठी तब्बल १५५ धावांची शानदार भागीदारी केली.मंधानाने ६६ चेंडूंमध्ये ९ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ८० धावांची धडाकेबाज खेळी केली. तिला शतक पूर्ण करता आले नाही, पण तिने संघाच्या मोठ्या स्कोअरचा पाया रचला. प्रतिका रावलनेही संयमी पण प्रभावी फलंदाजी करत ७५ धावांचे अर्धशतक झळकावले. हरमनप्रीत कौर (२२) आणि हरलीन देओल (३८) यांनी चांगला फॉर्म दाखवला. त्यानंतर जेमिमा रॉड्रिग्स (३३) आणि रिचा घोष (३२) यांनीही जलद धावा करत संघाचा धावफलक वेगाने पुढे नेला. एका वेळी भारत ३०० धावांचा टप्पा सहज पार करेल असे वाटत असताना, अखेरच्या षटकांमध्ये भारताचा डाव गडगडला. भारताने केवळ ३६ धावांत आपले शेवटचे ६ बळी गमावले आणि संघ ४८.५ षटकांत ३३० धावांवर सर्वबाद झाला.ऑस्ट्रेलियाकडून अनाबेल सदरलँडने शानदार गोलंदाजी करत ५ महत्त्वपूर्ण बळी घेतले. महिला विश्वचषकात ५ बळी घेणारी ती या स्पर्धेतील पहिली गोलंदाज ठरली. डावखुरी फिरकी गोलंदाज सोफी मोलिनिउक्सने देखील प्रभावी मारा करत ३ गडी बाद केले. मेगन शट आणि ॲ गार्डनर यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.भारताने ३३१ धावांचे मोठे लक्ष्य दिल्यामुळे ऑस्ट्रेलियासमोर एक मोठे आव्हान आहे. ऑस्ट्रेलियन संघाने आपला धावांचा पाठलाग सुरू केला असून, कर्णधार एलिसा हीली आणि फीबी लीचफिल्ड यांनी सलामीला सुरुवात केली आहे. भारताला सामना जिंकायचा असेल, तर ऑस्ट्रेलियाच्या मजबूत फलंदाजीला लवकर रोखण्यासाठी त्यांना प्रभावी गोलंदाजी करावी लागेल.

## अंतर झोन खो-खो स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी द्वितीय



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या अधिपत्याखाली नुकत्याच पार पडलेल्या अंतर झोन खो-खो मुलींच्या स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूरच्या बी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी कु. कल्पना कांबळे हिने उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचा लौकिक वाढविला आहे. तिच्या उत्कृष्ट प्रदर्शनामुळे महाविद्यालयाने स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. या यशामध्ये क्रीडा शिक्षक श्री. ऋषिकेश मस्के यांचे मार्गदर्शन लाभले. कु. कल्पना कांबळेच्या या कामगिरीबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी यांनी तिचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी कु. कल्पना कांबळेचे कौतुक करत भविष्यातील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

## अहमदपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सुशोभिकरण कामाची सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केली पाहणी



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अहमदपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराचे नगरपरिषदेमार्फत सुशोभिकरण करण्यात येत आहे. या कामाची सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज पाहणी केली. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार संजय बनसोडे, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, समाज कल्याण सहायक आयुक्त यादवराव गायकवाड, मुख्याधिकारी संतोष लोमटे यांच्यासह नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक व नागरिक यावेळी उपस्थित होते.

अहमदपूर नगरपरिषदेमार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात करण्यात येत असलेल्या सुशोभीकरण कामांमध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिका, अशोकस्तंभ, संसद भवनाची प्रतिकृती आदी कामांचा समावेश आहे. या कामांची सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट यांनी यावेळी पाहणी केली.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात बीसीए विभागातर्फे सायबर सिक्युरिटी सेमिनारचे यशस्वी आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या बीसीए विभागातर्फे एकदिवसीय सायबर सिक्युरिटी सेमिनारचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या सेमिनारमध्ये जेटकिंग लर्निंग सेंटर, चिंचवड (पुणे) येथील तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. शिव शर्मा, श्री. तेजस पालस पगार, श्री. अमित बागडे व श्री. विनोद माने यांनी विद्यार्थ्यांना टिपिकल हॅकिंग व सायबर सिक्युरिटी विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

सेमिनारचे प्रास्ताविक बीसीए विभागप्रमुख प्रा. शशिकांत स्वामी यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी आजच्या युगातील वाढत्या सायबर हल्ल्यांविषयी माहिती देत विद्यार्थी वर्गाने सतर्कता बाळगण्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुणे ग्रंथालय प्रमुख डॉ. विठ्ठल जाधव यांनी विद्यार्थ्यांना डेटा सायन्स व सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील नव्या घडामोडी व संधींबाबत मार्गदर्शन केले. सेमिनारदरम्यान तेजस पालस पगार व विनोद माने यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल हॅकिंगची पद्धत तसेच त्यापासून संरक्षण कसे करावे याचे प्रात्यक्षिक सादर केले. त्यांनी विद्यार्थ्यांमधील प्रतिनिधींची मदत घेऊन प्रत्यक्ष उदाहरणाद्वारे फेक मेसेज पाठवणे, लिंकद्वारे ॲप्लिकेशन ओपन करून मोबाईल हॅक करणे आणि त्यानंतर त्याचे संरक्षण कसे करावे याची सविस्तर माहिती दिली. तसेच सार्वजनिक ठिकाणी लॉगिन केल्यानंतर कोणती सुरक्षा उपाययोजना करावी याचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

बीसीए विभागातील एकूण २०० विद्यार्थ्यांनी या सेमिनारमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सेमिनार कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दयानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथालय प्रमुख डॉ. विठ्ठल जाधव व बीसीए विभागप्रमुख प्रा. शशिकांत स्वामी उपस्थित होते. या सेमिनारच्या यशस्वी आयोजनासाठी बीसीए विभागातील प्रा. नंदकुमार पाटील, प्रा. लहू शेंडगे, प्रा. प्रसाद पाटील, प्रा. गीतांजली जोशी, प्रा. ज्योती महावरकर आणि प्रा. अंजली बिरादार यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लातूर ग्रामीण मतदार संघातील २५ ग्रामपंचायतीची निवड

## आ. कराड यांच्या प्रयत्नातून कोट्यावधीचा निधी मिळणार

**लातूर/प्रतिनिधी :** भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या सीएसआर निधी अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील २५ ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली असून निवड करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना विविध विकास कामासाठी प्रत्येकी ७५ लक्ष असे एकूण अंदाजे १९ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध होणार आहे. सदरील योजनेत समावेश केल्याबद्दल आ. कराड यांचे त्या त्या ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त केले.

लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या संबंधिताकडे विशेष प्रयत्न केले. केलेल्या प्रयत्नामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील तब्बल २५ गावांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्या त्या गावातील ग्रामपंचायत आणि भाजपा पदाधिकाऱ्यांनी शनिवारी दुपारी लातूर येथील भाजपाच्या संपर्क कार्यालयात आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून जाहीर आभार व्यक्त केले. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, हनुमंतबापू नागटिळक, चिटणीस दशरथ सरवदे, लातूर संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूरचे अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडळ अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, शरद दरेकर, सुरज शिंदे, उद्धव काळे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

ज्या गावांनी आणि जनतेनी आपल्यावर विश्वास टाकून निवडून दिले अशा गावांचा सर्वांगीण विकास करणे हे आपले कर्तव्य समजून इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या सीएसआर निधीसाठी प्रयत्न केले. निवड झालेल्या




ग्रामपंचायती विविध कामाच्या माध्यमातून मॉडेल होणार असून प्रत्येक गावात सर्व कामे दर्जेदार व्हावीत असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या सीएसआर निधीसाठी पुढच्या वर्षी मतदार संघातील उर्वरित गावांचा समावेश केला जाईल असे बोलून दाखवले.

लातूर ग्रामीण मतदार संघातील रेणापूर तालुका कोष्टगाव, पाथरवाडी, मुरढव, दवणगाव, सांगवी, माकेगाव, वांगदरी, घनसरगाव, दर्जी बोरगाव. लातूर तालुका गाधवड, सामनगाव, पिंपळगाव अंबा, अंकोली, गातेगाव, सावरगाव, निवळी, चिंचोलीराव, हिसोरी, ममदापूर, भातांगळी आणि भादा सर्कल मधील समदर्गा, भादा, वडजी, वरवडा, वानवडा या गावाची निवड करण्यात आली असून निवड झालेल्या गावात सीसीटीव्ही कॅमेरे, सभागृह, सोलारवर ग्रामपंचायत कार्यालय आणि पिण्याच्या पाण्याचा पंप हाऊस, आरो प्लांट, डिजिटल शाळेची वर्गखोली, जि.प. शाळा सोलार वर करणे, शाळेची रंगरंगोटी दुरुस्ती, हायमस्ट दिवे, एलईडी पोलसह पथदिवे, सिमेंट रस्ता, पेव्हर ब्लॉक यासह विविध कामे केली जाणार आहे.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून निवड झालेल्या लातूर ग्रामीण मतदार संघातील २५ गावात जनहिताची कामे होणार असून विविध सर्वांगीण विकासाला गती मिळणार असल्याने त्या त्या गावात मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

## विमा क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी सातत्य असणे आवश्यक : श्री.ऋषीकेश देशमुख



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बँकींग अ‍ॅन्ड इन्शुरन्स समितीच्या वतीने विमा क्षेत्रातील करिअरच्या संधी विषयावर एकदिवशीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून एस.बी.आय. लाईफ चे वरिष्ठ व्यवस्थापक श्री.ऋषीकेश देशमुख यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. यावेळी बोलताना विद्यार्थ्यांनी विमा क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर होते. मंचावर उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बाळासाहेब चव्हाण, बँकींग अ‍ॅन्ड इन्शुरन्स समन्वयक डॉ निखिल व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना श्री.ऋषीकेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या काळात विमा क्षेत्राचे महत्व विशद करून विविध उदाहरणांच्या माध्यमातून विमा क्षेत्रात भविष्य घडविण्यासाठी मार्गदर्शन केले. समारोप करताना अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. निखिल व्यास यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.लता जाधव तर आभारप्रदर्शन प्रा.ऐश्वर्या कुलकर्णी यांनी केले. सदरील व्याख्यानासाठी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.निखिल व्यास, एस.बी.आय.लाईफ चे अनिकेत जोशी, डॉ. लता जाधव, प्रा.ऐश्वर्या कुलकर्णी, श्री.अमोल हणमंते, श्री.योगेश शर्मा यांनी परिश्रम घेतले.

## जय क्रांती महाविद्यालयात ग्रामीण विकास या पुस्तकाचे प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी :** जय क्रांती महाविद्यालय लातूर येथे इतिहास व मराठी विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये प्रो. डॉ. शरण निलंगेकर लिखित ग्रामीण विकास या पुस्तकाचे प्रकाशन संस्था सचिव प्रा. गोविंदराव घार सर प्राचार्य महादेव गव्हाणे प्राचार्य श्रीधर कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण विकासाच्या संदर्भाने झालेले प्रयत्न तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या विविध योजना व त्यांची फलश्रुती याचा मागोवा या पुस्तकात घेण्यात आलेला आहे ग्रामीण विकासाची पार्श्वभूमी समजून घेण्याचा दृष्टीने तसेच ग्रामीण विकासाचे नवीन आयाम त्याला अनुसरून शासन व प्रशासनाची भूमिका काय आहे तसेच ग्रामीण विकासात जनतेची भूमिका कशी महत्त्वपूर्ण आहे याबाबत विश्लेषण करण्याचा प्रयत्न संबंधित पुस्तकात करण्यात आलेला आहे हे पुस्तक विद्यार्थी वाचकांना उपयुक्त ठरेल प्रो. डॉ. शरण निलंगेकर लिखित ग्रामविकास या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रा.गोविंदराव घार प्राचार्य महादेव गव्हाणे प्राचार्य श्रीधर कोल्हे प्रा. प्रमोद चव्हाण प्रा. केशव आलगुले.

## केशवराजच्या माजी विद्यार्थ्याची भारतीय सैन्यात लेफ्टनंटपदी निवड



**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील २०१८-१९ च्या बॅचचे विद्यार्थी श्रीनिवास धर्मराज वांगे यांची भारतीय सैन्यात लेफ्टनंटपदी निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी, क्रीडा शिक्षक प्रयागराज गरुड तसेच त्यांचे मोठे बंधू श्रीधर वांगे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी आपला प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांना सांगताना श्रीनिवास वांगे म्हणाले, की एक सामान्य विद्यार्थीही आपले ध्येय ठरवून असामान्य कामगिरी करू शकतो. दहावीनंतर एन.डी.ए. च्या परीक्षेची तयारी करत असताना अपयश आले. या अपयशाने खचून न जाता इंजीनियरिंग करत भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. यूपीएससीकडून सैन्यात भरती होण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या सी.डी.एस. परीक्षेची तयारी केली आणि पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले, असे त्यांनी सांगितले. शाळेतील उपक्रम व कार्यक्रम हे आपल्या भावी आयुष्यासाठी, आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहेत असे सांगितले. 'मोठी स्वप्ने पहा, मोठे ध्येय ठरवा, ते मिळवण्यासाठी सतत प्रयत्न करत रहा, यश नक्कीच मिळेल' असा संदेश याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी श्रीनिवास वांगे यांना मिळालेल्या उत्तुंग यशाबद्दल व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रल्हाद माले यांनी केले.

या त्यांच्या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय समन्वयक चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्या हस्ते कुमारी तनवी व्यंकटराव कुंभार, जवाहर नवोदय विद्यालय या विद्यार्थिनीचा सत्कार

**निलंगा/प्रतिनिधी :** जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्या हस्ते मौजे मदनसुरी तालुका निलंगा जिल्हा लातूर येथील वेंकट रामराव कुंभार यांची कन्या जवाहर नवोदय विद्यालय लातूर येथे शिक्षण घेत असून कुमारी तनवी व्यंकट कुंभार हिने खो खो स्पर्धेमध्ये तालुका लेवल जिल्हा लेवल अत्यंत चांगला खो खो खेळल्यामुळे तिची निवड टीमच्या कॅप्टन पदी झाली. आणि महाराष्ट्र ओडिसा येथे झालेल्या खो खो स्पर्धेमध्ये अत्यंत चांगली कामगिरी केली अशी ही मुलगी मदनसुरी गावांमध्ये जन्म घेऊन एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेली आहे .आणि तिने मदनसुरी गावचे नाव लातूर जिल्ह्यामध्ये नाही महाराष्ट्रामध्ये देशामध्ये उत्कृष्ट कामगिरी करून गाजवलेला आहे. याबद्दल मला निश्चितच आनंद



होत आहे. कुठल्या क्षेत्रात कुणी कामगिरी करावं याबद्दल ज्यांच्या त्याच्या अंगातली सूक्तगुण हे सगळं घडवून आणतात .आणि असेच ग्रामीण भागातले कित्येक खेळाडू राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेले आहेत. कुठल्याही प्रकारचं खेळाचं वातावरण घरात नसताना आई-वडील आपला उदरनिर्वाह भागवण्यासाठी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये जीवन जगतात आणि त्या जोडप्याच्या पोटी तनवी सारखे मुलगी जन्माला येते आणि संपूर्ण खानदानी चे नाव रोशन करते ही अत्यंत महत्त्वाची बाब असून निश्चितच ग्रामीण भागातील मुलींनी तनवीचा आदर्श घ्यावा. असं काम तनवीने केलेल आहे. तिच्या पुढील खेळासाठी शिक्षणासाठी शिवसेनेचे मुख्य नेते सन्माननीय एकनाथराव शिंदे साहेब यांच्या वतीने शिवसेनेचा जिल्हाप्रमुख म्हणून मी मनस्वी हार्दिक हार्दिक शुभेच्छा शुभेच्छा देतो व तिचे खूप खूप अभिनंदन करतो असे उद्गार शिवसेना जिल्हाप्रमुख यांनी काढले. यावेळी मदनसूरी माजी सरपंच अशोक जाधव, मधुकर दाजी धोंडीराम जाधव नाना ग्रामपंचायत सदस्य अशोक भाऊ सूर्यवंशी, दिलीप जाधव, माधव शिंदे ,गुलाब माने, गोविंद दुकानदार ,माधव जाधव ,सचिन जाधव, महेश जाधव ,राहुल माने ,निखिल शिंदे ,आकाश शिंदे, संजय शिंदे, गोरोबा राजे ,विजय पांचाळ ,राम माने ,काशिनाथ सूर्यवंशी ,प्रदीप माने, संजय जाधव महेश कोतापुरे शहाजी माने, प्रणित संभाजी माने, असे अनेक जण उपस्थित होते.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.**




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## पोलीस जिल्हा क्रीडा स्पर्धेचा समारोप ; चार विभागांतील संघांचा समावेश

**लातूर/प्रतिनिधी :** काळाच्या ओघात पोलिसांच्या कामाचे स्वरुपही बदलत आहे. त्यामुळे प्रत्येक पोलीस हा शारीरिक व मानसिकदृष्ट्या मजबूत व कणखर असणे आवश्यक आहे. तणावमुक्त जीवनशैलीसाठी क्रीडा स्पर्धा हाच योग्य पर्याय असल्याचे मत श्री. संजयजी भारुका (प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर) यांनी व्यक्त केले आहे. तीन दिवसीय जिल्हास्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रंसगी ते बोलत होते.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे मार्गदर्शनात तीन दिवसीय जिल्हास्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा शनिवारी (दि.११) बाभळगाव येथील पोलीस कवायत मैदानावर पार पडला. या स्पर्धेसाठी पोलीस मुख्यालय, चाकूर उपविभाग, अहमदपूर उपविभाग, निलंगा उपविभाग अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशनचे पोलीस खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

आज इतर विभागापेक्षा पोलीस विभागावर मोठी जबाबदारी असल्याने प्रत्येक युनिफॉर्म मधील अधिकारी व कर्मचारी यांनी लोकशाही, जनतेप्रती एकनिष्ठ राहून कर्तव्य पार पाडावे असेही संजयजी भारुका यांनी सांगितले. फूटबॉल, व्हॉलीबॉल, हँडबॉल, बास्केटबॉल, खो-खो, कब्बडी तसेच धावणे, गोळाफेक, लांबउडी, भाला फेक, थाळी फेक, तायक्कांदो आदी स्पर्धा पार पडल्या.

या स्पर्धेत चाकूर, अहमदपूर, निलंगा उपविभाग व पोलीस मुख्यालय या चार विभागांचे संघ सहभागी होते. पोलीस मुख्यालयाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. उत्कृष्ठ महिला खेळाडू व पुरुष खेळाडू यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.

स्पर्धेच्या समारोपाच्या वेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, श्री पारसनाथ (कमांडर सी.आर.पी.एफ.) श्री. विशाल कोरे (सी.आर.पी.एफ. असिस्टंट कमांडर) अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, पोलीस उपाधीक्षक गृह मेत्रेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, रवींद्र चौधरी, गजानन भातलवंडे, साहेबराव नरवाडे, धुमे ,रायबोले, कुमार चौधरी, स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, शाखाप्रमुख, नागरिक तसेच विविध वर्तमानपत्राचे पत्रकार यांची उपस्थिती होती. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी राखीव पोलीस निरीक्षक शेख गफ्फार, पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख, क्रीडा प्रमुख रामलिंग शिंदे, युसुफअली धावडे, प्रशांत स्वामी, रियाज सौदागर, सुहास जाधव, प्रशिक्षक रौफ सय्यद, दयानंद गिरी यांनी परिश्रम घेतले.

## विलासराव देशमुख फाऊंडेशनतर्फे महिला उद्योजिका व्हीडीएफ बाजार

**लातूर/प्रतिनिधी :** खास दिवाळीनिमित्त महिलांच्या कर्तृत्वाला नवी दिशा देणारी पर्वणी विलासराव देशमुख फाऊंडेशन,लातूरच्या वतीने 'महिला उद्योजिका व्ही. डी. एफ. बाजार'च्या माध्यमातून दि. १४ आणि १५ ऑक्टोबर रोजी उपलब्ध करुन दिली आहे. या दोन दिवसांत विशेष सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेन्टीवन ॲग्री लि.च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून बचत गटातील महिला उद्योजकांना दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर मोठी व्यावसायिक संधी उपलब्ध करुन देणारे एक खास व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे.त्यांच्या गृह उपयोगी वस्तू, खाद्यपदार्थ व हस्तकला यांचे भव्य प्रदर्शन व विक्री दि. १४ व १५ ऑक्टोबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे होणार आहे.

'महिला उद्योजिका व्ही. डी. एफ. बाजार'चा शुभारंभ सोहळा दि. १४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे खासदार डॉ. शिवाजी काळगे,डॉ.सविता शिवाजी काळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. शुभारंभानंतर सायंकाळी ४ वाजता 'खेळ पैठणीचा', दि. १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.२० वाजता 'जागर लोककलेचा' हे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत. 'महिला उद्योजिका व्ही. डी. एफ. बाजार'मध्ये अधिकाधिक महिला बचत गटांनी सहभागी व्हावे.अधिक माहितीसाठी संगीता मोळवणे ९४०४६०३६६९, प्रितम जाधव ८६९८७९६९०० व गजानन बोयणे ७२७६३१३७०८ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विलासराव देशमुख फाऊंडेशन लातूरच्या वतीने करण्यात आले आहे.

## दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता अकरावीच्या पालक मेळाव्याला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता अकरावीच्या नीट आणि सीईटीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा याचे आयोजन दि.१२ ऑक्टोंबर २०२५ रोजी दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात करण्यात आलेले होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून प्रा.मनोहर कबाडे,कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी,कोषाध्यक्ष संजय बोरा,संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,नीट समन्वयक डॉ.कोमल गोमारे,सीईटी समन्वयक प्रा.कविता जाधव,प्रा.बळवंत सूर्यवंशी,प्रा.विजयकुमार मांदळे,पालक प्रतिनिधी ड. प्रशांत आकनगिरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक प्रा.मनोहर कबाडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून पालकांनी विवेकी पालक व्हावे असे सांगितले तर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करत असताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी दयानंद शिक्षण संस्था व महाविद्यालयाची विद्यार्थी केंद्रबिंदू मानून यशस्वी वाटचाल सुरू आहे असे सांगितले.पालक प्रतिनिधी ड.प्रशांत आकनगिरे यांनी दयानंद विज्ञान महाविद्यालय व संस्था पालकांच्या विश्वासास पात्र आहे, विद्यार्थ्यांचे उज्ज्वल करिअर येथे निश्चित घडते असे मनोगतातून आपले मत व्यक्त केले.

सूत्रसंचालन प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले तर आभार पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर यांनी मानले.यावेळी ऊर्जा संवर्धन प्रतिज्ञा घेण्यात आली.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.याप्रसंगी महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि जवळपास ७०० पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# लातुरात १४ ऑक्टोबर रोजी वारकरी साहित्य परिषदेची ज्ञानोबा-तुकोबा आधार दिंडी

**लातूर/प्रतिनिधी :** संतभूमी मराठवाड्यात नैसर्गिक आपत्तीमुळे खचून गेलेल्या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी वारकरी साहित्य परिषद सरसावली असून परिषदेच्या वतीने ज्ञानोबा-तुकोबा आधार दिंडी या आगळ्यावेगळ्या सामाजिक चळवळीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील दिंडी मंगळवार दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी लातूर शहरात येणार असल्याची माहिती वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्रचे निरीक्षक रोपण खटावे यांनी शनिवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली. दिली.

मराठवाड्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्यांना आळा बसावा, मानसिक आधार मिळून आत्महत्यांचे प्रमाण रोखले जावे या उद्देशाने वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.विठ्ठल पाटील (काकाजी) आणि सचिव डॉ.सदानंद मोरे यांच्या संकल्पनेतून ज्ञानोबा- तुकोबा आधार दिंडी संपूर्ण मराठवाड्याचा दौरा करणार आहे. शनिवारी सकाळी धाराशिव येथून या दिंडीस प्रारंभ झाला. शनिवारी दुपारी बीड, रविवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर, दुपारी जालना, सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी परभणी, दुपारी हिंगोली तर मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी सकाळी नांदेड आणि दुपारी लातूर येथे ही दिंडी पोहचणार असल्याचे सांगून रोपण खटावे पुढे म्हणाले की, लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारी अडीच वाजता या दिंडीचे आगमन झाल्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत शेतकरी बांधवांना परिस्थिती कितीही बिकट आली तरी आम्ही आत्महत्या करणार नाही, अशी शपथ दिली जाणार आहे. मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्याचे कामही या दिंडीच्या माध्यमातून केले जाणार असल्याचे खटावे यांनी सांगितले. वारकरी साहित्य परिषदेचे लातूर जिल्हाध्यक्ष हभप. श्रीधर धुमाळ महाराज यांनी या दिंडीच्या माध्यमातून खचलेल्या शेतकऱ्यांचे मनपरिवर्तन करण्यासाठीचे सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले. या दिंडीमध्ये जिल्हाभरातील वाडी - वस्तीवरील शेतकरी - वारकरी बांधवही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविणार आहेत. भेदरलेल्या - घाबरलेल्या शेतकऱ्यांना मानसिक बळ देणे अतिशय आवश्यक आहे. त्यादृष्टीनेच वारकरी साहित्य परिषदेचे संस्थापक हभप. विठ्ठल पाटील (काकाजी) यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

वारकरी साहित्य परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्षा चंद्रलेखा गुंडरे यांनी या नैसर्गिक आघातातून शेतकरी बांधव लवकरात लवकर सावरला पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या. या आधार दिंडीच्या यशस्वीतेसाठी वारकरी साहित्य परिषदेचे कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत आहेत.मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात हा उपक्रम राबविला जात आहे. शेतकरी असो वा माणूस आधार दिला तरच तो व्यवस्थित जगू शकतो. परिषदेच्या माध्यमातून गाव तेथे हरिपाठ मंडळाची स्थापनाही केली गेल्याचे त्यांनी नमूद केले. सुधाकर महाराज फुलमंटे अतिवृष्टीने होत्याचे नव्हते केल्याने शेतकरी राजा मानसिकदृष्टया खचला आहे. त्यांना या माध्यमातून आत्महत्या करणार नसल्याची शपथ दिली जाणार आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती राहणार आहे. हरिपाठानंतर या कार्यक्रमाची सांगता होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शंकर महाराज येदले, लिंबराज महाराज बोळंगे यांचीही उपस्थिती होती.



## तिरंगी क्रिकेट स्पर्धेत धनाजी इलेव्हनचा विजयी जल्लोष!

**-: सिरीजमधील उत्कृष्ट प्रदर्शने :-**
**मालिकावीर,उत्कृष्ट फलंदाज,**
**उत्कृष्ट गोलंदाज : बालाजी घोरबांड**
**सामनावीर: अमोल मुळे**
**उत्कृष्ट क्षेत्ररक्षक: सचिन बावगे**

**लातूर/प्रतिनिधी :** मैत्री क्रिकेट क्लब आयोजित तिरंगी क्रिकेट स्पर्धा दयानंद मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडली. या रोमांचक स्पर्धेत धनाजी इलेव्हन संघाने प्रभावी खेळ करत विजेतेपद पटकावले, तर अहेमद इलेव्हन संघ उपविजेता ठरला. दत्ता इलेव्हन संघाने देखील चुरशीची लढत देत प्रेक्षकांची मने जिंकली.

स्पर्धेतील सामन्यांदरम्यान चौकार-षटकारांचा वर्षाव आणि गोलंदाजांच्या अचूक चेंडूंनी मैदानात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरात प्रत्येक सामना रंगतदार ठरला. स्पर्धेच्या समारोप प्रसंगी पारितोषिक वितरण समारंभात मैत्री क्रिकेट क्लबचे पदाधिकारी, मान्यवर व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक ट्रॉफी आणि वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली.

या स्पर्धेमुळे लातूर शहरातील क्रिकेटप्रेमींना थरारक आणि अविस्मरणीय अनुभव मिळाला. तरुण खेळाडूंच्या जिद्दीचा आणि संघभावनेचा प्रत्यय मैदानावर प्रत्येक क्षणी जाणवला.

# लातूर ग्रामीणमध्ये भाजपाला शंभर टक्के यशासाठी सर्वांनी प्रयत्न करावे-आ. कराड

**लातूर/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीत सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली, जिकरीचे प्रयत्न केले. मतदारानी मोठा आशीर्वाद दिला यामुळेच लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपाच्या विजयाचा नवा इतिहास घडला. येणाऱ्या काळात होणाऱ्या रेणापूर नगरपंचायतीसह जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपाला शंभर टक्के यश मिळावे यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे असे आवाहन भाजपा नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केले.

येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक अनुषंगाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाच्या प्रमुख पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीची बैठक भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी दुपारी झाली. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, हनुमंतबापू नागटिळक, चिटणीस दशरथ सरवदे, लातूर संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूरचे अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडळ अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, शरद दरेकर, सुरज शिंदे, उद्धव काळे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

येत्या नोव्हेंबर महिन्यात नगरपालिका, नगरपंचायतीच्या आणि डिसेंबर महिन्यात जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका होतील असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मागील वेळी रेणापूर नगरपंचायत आणि रेणापूर पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात आली होती तर जिल्हा परिषदेच्या ११ पैकी ६ जागेवर यश मिळाले होते. बहुतांशी जागा अत्यंत कमी मताने आपल्या हातून गेल्या. यावेळी प्रत्येक मतदार संघात,नप प्रभागात पक्षाच्या वतीने जनतेच्या भावना जाणून घेऊन जनतेच्या शिफारशीनुसार उमेदवारी दिली जाईल असे बोलून दाखवले.

लातूर ग्रामीण मतदार संघातील जवळपास सर्वच मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत मोठ्या प्रमाणात विकासाची कामे झाली, शासनाच्या विविध योजनेतून निधी मिळवून दिला. गेल्या महिन्यात झालेल्या सततच्या पावसामुळे आणि पूर परिस्थितीमुळे नुकसानीत सापडलेल्या शेतकऱ्यांना राज्यातील महायुती शासनाने पॅकेज जाहीर करून मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. एवढे मोठे पॅकेज आजपर्यंत कोणीच दिले नाही. असे सांगून संत श्री गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचे राज्यात सर्वप्रथम विजयादशमीच्या दिवशी गाळप सुरू झाले असून दिवस रात्र कारखाना सुरू आहे. आडवणूक होत असलेल्या शेतकऱ्यांना ऊस उत्पादकांना कारखान्याच्या माध्यमातून सक्षम पर्याय मिळाला आहे.

भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आपसातील हेवे दावे मतभेद बाजूला ठेवून संपूर्ण लातूर ग्रामीण मतदार संघातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शंभर टक्के भाजपला यश मिळाले पाहिजे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत रेणापूर नगरपंचायत रेणापूर पंचायत समिती पुन्हा भाजपाच्याच ताब्यात आल्या पाहिजेत आणि लातूर पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकला पाहिजे या ध्येयाने आणि जिद्दीने सर्वांनी कामाला लागावे असेही आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

या बैठकीस लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दशरथ सरवदे यांनी आभार मानले.

# पीएनजी ज्वेलर्स तर्फे दिवाळीनिमित्त विशेष फेस्टिव्ह ऑफर्स

### सोन्याच्या घडणावळीवर ५० टक्के सूट

**लातूर/प्रतिनिधी :** भारतातील विश्वासार्ह संघटित कौटुंबिक ज्वेलर, पीएनजी ज्वेलर्सला आपल्या भव्य दिवाळी मोहिमेची घोषणा करताना आनंद होत आहे. ही मोहिम २२ सप्टेंबरपासून सुरू होईल आणि २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालेल. या मोहिमेमुळे ग्राहकांना अत्यंत आकर्षक किमतीत उत्कृष्ट दागिने घरी आणण्याची एक अनोखी संधी मिळणार आहे, ज्यामुळे हा सणासुदीचा काळ अधिक अविस्मरणीय बनेल यात शंका नाही.

या दिवाळी मोहिमेअंतर्गत, ग्राहक सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर ५० टक्के पर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १०० टक्के पर्यंत सूट तसेच जुने सोने बदलताना ० टक्के कपात या खास ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात. या ऑफर्स सर्व पीएनजी ज्वेलर्सच्या स्टोअर्समध्ये आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असतील, ज्यामुळे अतुलनीय कारागिरीचे कालातीत दागिने घेऊन सणासुदीचा आनंद साजरा करू इच्छिणाऱ्या दागिन्यांच्या शौकिनांसाठी सुलभता आणि सोय सुनिश्चित होईल.




या मोहिमेबद्दल बोल-ताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, दिवाळी हा प्रकाश, समृद्धी आणि एकत्र येण्याचा सण आहे. पिढ्यानपिढ्या पीएनजी ज्वेलर्सवर विश्वास ठेवणाऱ्या आमच्या ग्राहकांसोबत हा सण साजरा करण्याची ही आमच्यासाठी नेहमीच एक खास संधी असते. आमचे दागिने अधिक सुलभ बनवून, उत्तम मूल्य प्रदान करत, सणाचा आनंद पसरवण्याचा हा आमचा मार्ग आहे. परंपरा, सौंदर्य आणि परवडणाऱ्या किमतींचा परिपूर्ण संगम अनुभवण्यासाठी आम्ही आमच्या ग्राहकांचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत.

भारतात उत्तम दागिने खरेदी करण्यासाठी दिवाळी हा सर्वात शुभ काळ मानला जातो. या मोहिमेद्वारे, पीएनजी ज्वेलर्स आपला विश्वास, शुद्धता आणि कारागिरी या खास वैशिष्ट्यांद्वारे ग्राहकांशी असलेले आपले नाते अधिक दृढ करत आहे. या सणासुदीच्या काळात, खरेदीदारांना सोने आणि हिऱ्यांच्या दागिन्यांची विस्तृत श्रेणी एक्सप्लोर करण्याची संधी मिळेल, जे पारंपरिक कलात्मकता आणि समकालीन शैली या दोन्हींचे प्रतिबिंब दर्शविण्यासाठी खास तयार केले गेले आहेत.

## एक तास समृद्ध आरोग्यासाठी आनंददायी शनिवाराचा उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्थेच्या अंतर्गत दयानंद कला महाविद्यालय, लातूर च्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (छएझ २०२०) च्या अंमलबजावणीवर आधारित विशेष आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत एक तास समृद्ध आरोग्यासाठी आनंददायी शनिवाराचा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

निरोगी आयुष्य आणि सकारात्मक मनोवृत्ती यासाठी 'एक तास समृद्ध आरोग्यासाठी' हा उपक्रम महाविद्यालयात उत्साहात पार पडला. शनिवारी दुपारी सर्व विद्यार्थी एकत्र येऊन सहभाग नोंदविला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांस शारीरिक तसेच मानसिक आरोग्याची जाणीव करून देणे हा होता.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड यांनी 'आनंददायी शनिवार'ही संकल्पना मांडत प्रत्येक विद्यार्थ्यांनी तसे दररोज एक तास शरीरासाठी देणे आवश्यक आहे. ज्यांना शक्य नसेल त्यांनी अशा उपक्रमांच्या माध्यमातुन आठवड्यातील किमान एक तास स्वतःच्या आरोग्यासाठी द्यावा, असे आवाहन केले. उपस्थित विद्यार्थ्यांना या उपक्रमात उपप्राचार्य डॉ. नागरगोजे यांनी स्वास्थ्यातच संपन्नता हा संदेश दिला. हा उपक्रम नियमितपणे सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ दिलीप नागरगोजे यांनी आयोजित केला होता. या उपक्रमात संगीतावर आधारीत विविध शारीरिक कसरती श्री. निखील पवार व गोरे या विद्यार्थ्यांने करून घेतल्या. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ.प्रशांत दिक्षीत, प्रा.महेश जंगापल्ले, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत दयानंद विज्ञानच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरणांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविला

**लातूर/प्रतिनिधी :** व्यंकटेश महाजन कॉलेज,धाराशिव व मायक्रोबायोलॉजी सोसायटी,इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानाद्वारे संचलित दि.१० ते ११ ऑक्टोंबर २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या सूक्ष्मजीवशास्त्रीय संशोधनाद्वारे मानवी कल्याणासाठी पर्यावरणीय शाश्वतता या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील एकूण ०८ पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरणामध्ये सहभाग नोंदविला होता.यात साळुंके ऋतुजा हिने प्रथम क्रमांक तर संकेत भादाडे याने द्वितीय क्रमांक मिळविला आहे. त्यांनी अनुक्रमे प्रतिजैविक क्रियाकलाप पार्थेनियम हिस्टेरोफोरस व बुरशीजन्य जैविक कीटकनाशक - पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन या विषयावर पोस्टर सादरीकरण केले होते.तसेच श्रुती पवार,श्रद्धा माने,आगाव अक्षर,अभिषेक लकडे,शेख मोमीन,आलापुरे रितिका या विद्यार्थ्यांनी देखील पोस्टर सादरीकरण केले. यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.तसेच पदव्युत्तर समन्वयक प्रा.शितल पाटील यांनी पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेसाठी परिश्रम घेतले.याचबरोबर डॉ.महेश करळे,डॉ.दीप्ती ढेरे,प्रा.शैलजा धुतेकर,प्रा. अनुराधा इंगळे,प्रा.संध्याराणी टेकाळे,संतोष सूर्यवंशी,माधव सूर्यवंशी,अशोक मदने याचे देखील मोलाचे सहकार्य लाभले.

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६